रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३४१
www.ramprahar.com
◆ सोमवार, २९ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सहाण बायपासवरील पाल्हे पूल धोकादायक/२
न्यायालयीन आदेश पडताळणीचे आयुक्तांचे निर्देश/६
'सीकेटी'च्या वेदांतची स्केटिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी/८

## पंतप्रधान नरेंद्र मोदींना सेशेल्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासातील उत्कृष्ट नेतृत्वासाठी सेशेल्स देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन' प्रदान करण्यात आला आहे. हवामान कृती, हरित विकास आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी त्यांच्या प्रयत्नांची दखल घेत सेशेल्सने हा सर्वोच्च सन्मान दिला आहे. शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण आणि ब्लू इकॉनॉमी म्हणजेच सागरी अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या दीर्घकालीन कामाची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या मानपत्रात लहान विकसनशील देशांना त्यांनी दिलेला पाठिंबा, हवामान लवचिकता, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि महासागरांच्या संसाधनांचे जबाबदार व्यवस्थापन या बाबींचा गौरव करण्यात आला आहे. तसेच यातून भारत आणि सेशेल्समधील दृढ होत चाललेल्या भागीदारीवरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

# महाडच्या राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेत समतेचा जागर

### जातीपातीच्या राजकारणाला केंद्रीय मंत्री रिजिजूंचा विरोध





**महाड : प्रतिनिधी**

महाड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे रविवारी (दि. २८) आयोजित राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेतून समतेचा आणि सामाजिक न्यायाचा संदेश देण्यात आला. यावेळी केंद्रीय संसदीय कार्य व अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरण रिजिजू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मतांचे राजकारण करणे अत्यंत दुर्दैवी असून अशा प्रवृत्तीला माझा ठाम विरोध आहे, असे स्पष्ट केले. तसेच देशातील प्रत्येक भारतीयाने महाडच्या ऐतिहासिक चवदार तळ्याला एकदा भेट देऊन तळ्याचे किमान एक थेंब तरी पाणी प्राशन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

विवेक विचार मंच, बार्टी, आर्टी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे आणि सहयोगी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेला राज्यभरातील सामाजिक संस्था, कार्यकर्ते, अभ्यासक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली. या परिषदेत सामाजिक, शैक्षणिक आणि समतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार' प्रदान करून गौरवण्यात आले. यावेळी रिजिजू म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहेत, मात्र स्वातंत्र्यानंतरही समाजात काही ठिकाणी जातीपातीचे आणि संकुचित विचारांचे राजकारण सुरू असल्याची खंत वाटते. स्वतः बौद्ध समाजातून येत असल्याचे सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील पहिला बौद्ध कॅबिनेट मंत्री होण्याचा सन्मान मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

संविधान बदलण्याबाबत होत असलेल्या अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करीत संविधानाचा सर्वाधिक सन्मान करणारे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी असल्याचा दावा त्यांनी केला. जनधन योजना, डिजिटल इंडियासारख्या उपक्रमांमुळे समाजातील तळागाळातील घटकांना समान संधी उपलब्ध झाल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या निधनानंतर अनेक वर्षांनी भारतरत्न पुरस्कार मिळाला ही बाब खेदजनक असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाडच्या ऐतिहासिक चवदार तळ्याचा उल्लेख करताना त्यांनी तेथील पाणी प्राशन करण्याची इच्छा व्यक्त केली. सध्या सुरू असलेल्या सुशोभीकरणाच्या कामांमुळे ते शक्य झाले नसले तरी कामे पूर्ण झाल्यानंतर पुन्हा महाडला भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले. चवदार तळ्याचे ऐतिहासिक महत्त्व देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचले पाहिजे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रातील बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन सर्व स्मृतिस्थळांचा विकास व सुशोभीकरण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र स्तरावरून आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी समाजातील सर्व घटक आज आंबेडकरी समाजासोबत हातात हात घालून काम करण्यास तयार असल्याचे सांगितले. सामाजिक परिवर्तनासाठी आंबेडकरी समाजाने इतर समाजघटकांसोबत खांद्याला खांदा लावून काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केंद्रीय मंत्री रिजिजू यांच्याकडे बौद्धगया येथे बौद्ध भक्तांसाठी विहार बांधण्याकामी १० एकर जागेची मागणी केली. (पान २ वर...)

# लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांना रक्तदानातून अभिवादन

### पनवेलमध्ये शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने शेतकरी, कामगार व गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी संपूर्ण आयुष्य वेचणारे प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या १३व्या स्मृतिदिनानिमित्त रविवारी (दि. २८) पनवेल येथील आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मोठ्या संख्येने युवक, नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी रक्तदान करून दिवंगत दि. बा. पाटील यांना अभिवादन केले. या सामाजिक उपक्रमाला श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट, राजस्थानी महिला मंडळ तसेच रुधिरसेतू सेवा संस्था यांचे मोलाचे सहकार्य लाभले. रक्तदान शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, दिवंगत नेते दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील तसेच पनवेल पालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत अशा सामाजिक उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होत असल्याचे सांगितले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी पनवेल उरण आगरी समाज मंडळ व सहकार्य करणाऱ्या सर्व सामाजिक संस्थांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाला कविता पाटील, जितेंद्र म्हात्रे, अरूणा पाटील, माधुरी जगे, राजेश हुद्दार यांसह समाजबांधव, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोकणच्या लेकीने रचला इतिहास

### प्राजक्ता बोंगाळे अमेरिकन सैन्यातील पहिली मराठी महिला

**दापोली/पुणे : प्रतिनिधी**



रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीची लेक प्राजक्ता उर्फ सारा बोंगाळे हिने अमेरिकन सैन्यात भरती होऊन इतिहास रचला आहे. अमेरिकन लष्कराचे खडतर प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणारी ती महाराष्ट्रातील पहिली मराठी महिला ठरली आहे. कोकणच्या या कन्येची कामगिरी आता जगभर चर्चेचा विषय बनली आहे.

लहानपणापासून सैन्याची स्वप्ने पाहणाऱ्या प्राजक्ताला एका अपघातामुळे भारतीय लष्करात जाण्याचा मार्ग बंद झाला, पण जिद्द काय असते हे तिने दाखवून दिले. पदव्युत्तर शिक्षणानंतर अमेरिकेत स्थायिक झाल्यावर तिने 'क्लिनिकल रिसर्च सायंटिस्ट' म्हणून नाव कमावले. एवढ्यावरच न थांबता सौंदर्याच्या क्षेत्रातही चमक दाखवत 'यूएसए मिसेस मिडवेस्ट युनिव्हर्स' किताब पटकावला, मात्र मनातली देशसेवेची ज्योत विझली नव्हती. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत शिस्तबद्ध दिनचर्या आणि फिटनेसच्या जोरावर तिने अमेरिकन सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला आणि तो तडीस नेलाच.

प्रशिक्षणादरम्यान उत्कृष्ट नेमबाजीसाठी तिला 'मार्क्समनशिप पदक' देऊन गौरवण्यात आले. बॅचमध्ये सर्वोच्च शैक्षणिक गुण मिळवण्याचा मानही तिनेच मिळवला. सध्या ती अमेरिकन सैन्याच्या मेडिकल विभागात सेवा देत आहे. विज्ञान, सौंदर्य आणि थेट देशसेवा अशा तीनही क्षेत्रांत यशाची गरुडझेप घेणाऱ्या प्राजक्ताच्या या प्रवासात पती समीर बोंगाळे आणि संपूर्ण कुटुंबाची मोलाची साथ लाभली.

# खालापुरात दोन मोटरसायकल अपघात; दोघांचा मृत्यू, एक जण गंभीर जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शनिवारी (दि. २७) घडलेल्या दोन वेगवेगळ्या मोटारसायकल अपघातांत दोन जणांचा मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी झाला. दोन्ही घटनांप्रकरणी खालापूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर शेडवली फाटा येथे शनिवारी रात्री नऊच्या सुमारास कारने मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात मोटारसायकलस्वार मयूर पवार (३५, राहणार कशेळे, कर्जत) हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने खोपोली येथील पार्वती हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. खालापूर पोलिसांनी कारचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी घटना शनिवारी पहाटे दोनच्या सुमारास खालापूर फाटा येथील चौकात घडली. मोटारसायकलस्वाराने पुढे जाणाऱ्या अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात पेण सापोली येथील दीपक परशुराम वाघमारे (४२) यांचा जागीच मृत्यू झाला, तर हरीश हिलम (४०) गंभीर जखमी झाले. जखमीवर उपचार सुरू आहेत. दोन्ही अपघातांमुळे महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून फरार वाहनांचा शोध सुरू आहे.

# समृद्धीवर ट्रकला धडकली कार

### एकाच कुटुंबातील पाच जणांचा दुर्दैवी अंत

**अमरावती : प्रतिनिधी**





अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यात समृद्धी महामार्गावर रविवारी (दि. २८) भीषण अपघात घडला. चॅनेल क्रमांक १०६ जवळ चंद्रपूरहून मुंबईच्या दिशेने निघालेल्या वेगाने जाणाऱ्या कारने पुढे जात असलेल्या भरधाव ट्रकला मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात कारचा चक्काचूर झाला असून एकाच कुटुंबातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला.

दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि समृद्धी महामार्गावरील आपत्कालीन बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर वाहनाचा पूर्णपणे चुराडा झाल्याने कारमधील सर्व प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेले पाचही जण एकाच कुटुंबाशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे. मृतांमध्ये दोन पुरुष, दोन महिला आणि एका अल्पवयीन मुलीचा समावेश आहे.

# शिवप्रेमींसाठी खूशखबर!

### रायगडावर आता ५० रुपयांत रोप वे प्रवास

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानी रायगड किल्ल्यावर जाणाऱ्या शिवभक्त आणि पर्यटकांसाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. सध्या ३५० रुपये मोजावे लागणाऱ्या रोप वे प्रवासासाठी आता केवळ ५० ते १०० रुपये मोजावे लागणार आहेत. दुर्गराज रायगडावर शासन स्वतःचा अत्याधुनिक रोप वे उभारणार असून पुरातत्त्व विभागाने या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवला आहे.

रायगडावर सध्या खासगी कंपनीचा रोप वे कार्यरत आहे. त्यासाठी प्रतिव्यक्ती ३२५ ते ३५० रुपये भाडे आकारले जाते. त्यामुळे अनेक सर्वसामान्य शिवभक्त व पर्यटकांना पायवाटेने गड चढावा लागतो. शिवाय गडसंवर्धनासाठी लागणारे साहित्य वाहून नेण्यासाठी प्रतिकिलो ६.३ रुपये मोजावे लागतात. यामुळे संवर्धन कामांचा खर्च दुप्पट-तिप्पट होतो, अशी माहिती रायगड विकास प्राधिकरणाने दिली.

हा खर्च कमी करण्यासाठी आणि पर्यटकांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या मालकीचा नवा अत्याधुनिक रोप वे उभारला जाणार आहे. यासाठी छत्रपती संभाजीराजे यांच्या पुढाकाराने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून २०१८ पासून दिल्लीतील पुरातत्त्व विभागाकडे पाठपुरावा सुरू होता. आता त्याला यश मिळाले असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.





# श्रीवर्धन शहरात होणाऱ्या बहुचर्चित तारांगणाचे काम संथगतीने; कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह

**श्रीवर्धन : बातमीदार**

मागील दोन ते तीन वर्षांपासून श्रीवर्धन शहरामध्ये सुनियोजित असे तारांगण होणार, अशा चर्चा मोठ्या प्रमाणावर सुरु होत्या. प्रत्यक्षात या तारांगणाच्या कामाची सुरुवात व्हायला देखील खूप उशीर झाला. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याच्या उत्तरेकडे ज्या ठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारा संपतो. त्याच्या काही अंतर अगोदर या तारांगणाचे काम सुरू करण्यात आले आहे. काही प्रमाणात आरसीसी व जांभ्या दगडामध्ये काम सुरू आहे.



मात्र त्या ठिकाणी सुरू असलेले काम पाहिल्यानंतर या ठिकाणी खरोखर तारांगण होत आहे की, लॉजिंग साठी रूम बांधल्या जात आहेत. असा प्रश्न प्रत्यक्ष दर्शिना पडतो. आता पावसाळा सुरू झालेला असून तारांगणाचे काम ज्या ठिकाणी सुरू आहे त्या ठिकाणी रेती, खडी, सिमेंटच्या गोणी, जांभ्या दगडाचे चिरे इत्यादी मटेरियल खूप मोठ्या प्रमाणात पडलेले आहे.

परंतु काम सुरू झाल्यानंतर ज्या गतीने व्हायला पाहिजे होते. त्या गतीने काम होत नसून अत्यंत संथ गतीने काम सुरू आहे. सदर तारांगणाचे बांधकाम हे समुद्रकिनाऱ्याला लागूनच आहे. त्यामुळे त्या ठिकाणी आरसीसी बांधकाम असायला हवे होते. परंतु बांधकामाचा प्रकार बघितल्यानंतर त्यावरती पत्रे किंवा अन्य कोणत्यातरी मटेरियल चे छप्पर बनवण्यात येणार असल्याचे दिसून येते. पावसाळ्यामध्ये समुद्रकिनारी वाऱ्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात असते.

त्याचप्रमाणे कोकण किनारपट्टीवर अनेक वेळा चक्रीवादळ देखील होतात. या वादळांमध्ये सदर वास्तूचे नुकसान होऊ नये, यासाठी आरसीसी बांधकाम करणे अत्यंत गरजेचे होते. परंतु सदर तारांगणाचे आर्किटेक्चर प्लॅन बनवणाऱ्याने आरसीसी छत का घेतले नाही? हा प्रश्न देखील उपस्थित होत आहे.

तारांगणाकडे जाण्यासाठी वेताळ पाखाडी व ओजाळे पाखाडी या दोन ठिकाणाहून रस्ते आहेत. मात्र सदरचे रस्ते हे अरुंद आहेत. जेमतेम एक चार चाकी वाहन जाईल एवढाच रस्ता आहे. श्रीवर्धनला येणारे पर्यटक पाच मिनिटे देखील चालण्याची तसदी घेत नाहीत. त्यांना आपल्या इच्छित स्थळी जाण्यासाठी आपले चार चाकी वाहन घेऊन जाणेच गरजेचे असते.

याचा प्रत्यय समुद्रकिनाऱ्यावरती येतो. त्यामुळे तारांगण पाहण्यासाठी पर्यटक चार चाकी वाहन घेऊन गेले तर त्या ठिकाणी वाहतूक कोंडी नित्याचीच होणार आहे. आता पावसाळा सुरू झाल्यामुळे पर्यटकांचे प्रमाण थोडे कमी होणार आहे. परंतु दिवाळीच्या आसपास पर्यटकांचा ओघ श्रीवर्धन कडे खूप मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

मात्र श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंगची कोणतीही व्यवस्था नसल्याने श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती पार्किंगसाठी गंभीर समस्या निर्माण होणार आहे. तरी श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी श्रीवर्धन शहरामध्ये समुद्रकिनारी सर्वप्रथम पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून द्यावी व या गोष्टीकडे प्राधान्याने लक्ष द्यावे.

सदर तारांगणाचे जोते व जांभ्या दगडाचे बांधकाम पूर्ण झाले असून अजून छपराचे काम बाकी आहे. मात्र सदर काम करून घेणाऱ्या संबंधित विभागाने सदर तारांगणावरती आरसीसी छतच टाकून घ्यावे. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# आमदार रवीशेठ पाटील यांच्या उपस्थितीत मोठे वढाव येथे रस्त्याचे लोकार्पण



**पेण : प्रतिनिधी**

वढाव ते मोठेवढाव दोन किमी.या रस्त्याचे लोकार्पण सोहळा विद्यमान आमदार रविशेठजी पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला .यावेळी सौ .नीलिमा ताई पाटील माजी. जिल्हापरिषद अध्यक्षा,प्रभाकर म्हात्रे (हरीओम शेठ )जिल्हा परिषद सदस्य, विवेक म्हात्रे पंचायत समिती पेण गटनेते ,श्रीकांत सर माजी भाजप अध्यक्ष पेण ,प्रदीप म्हात्रे ,सुदेश ठाकूर सरपंच ग्राम. प .वाशी, कमलाकर मोकल ,जाभले सर ,आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ह .भ .प .कृष्णा वर्तक (गुरुजी) यांनी रवीशेठ पाटील रवी शेठ पाटील यांच्या माध्यमातून वाशी दुर्गम भागातील रस्ते ,मूळ रस्त्याला जोडले गेले. पेण मतदार संघातील आगरी समाजाचे उदार दातृत्व ,खंबीर नेतृत्व, लौकिक व्यक्तिमत्व, आहे.मोठेवढाव या गावासाठी ६० लाखाची निधी टाकून याचे काम पूर्ण केले .त्याबद्दल त्यांना हार ,शाळा, श्रीफळ,पुष्पगुच्छ ,देऊन गावातील ज्येष्ठ नागरिक शंकर पा.वर्तक, व देवीचंद का. वर्तक कमलाकर वर्तक, शिवाजी म्हात्रे ,रवींद्र वर्तक.यांनी सन्मानित केले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना पाटील साहेब म्हणाले.आज आपण अनेक विकासाची कामे खारेपाटं भागासाठी केली .त्यात महत्त्वाचा हा आपला रस्ता. साठ लाखाची निधी टाकून रस्ता पूर्ण केला यात मला समाधान आहे .देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब, व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या आशीर्वादाने ही विकासाचे कार्य पूर्ण करत आहोत. सर्वांनी मला प्रेम द्या कमी पडू देणार नाही .असं भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृष्णा वर्तक, समाजसेवक, विकास म्हात्रे माजी .ग्राम .प .सदस्य वढाव ,तरुण मित्र मंडळी यांनी मेहनत घेतली.

# पोलादपूर तालुक्यातील शेतकरी फार्मर कप २६–२७ स्पर्धेसाठी सज्ज; ६७ शेतकऱ्यांची गट बांधणी पूर्ण; ५१ पुरुष आणि ३१ महिला सहभागी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील ६७ शेतकऱ्यांचे गट सद्यस्थितीत फार्मर कप २०२६–२७ स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत. याखेरीज, ११ शेतकरी गटांनी अद्याप सुरुवात केली नसून ४ शेतकरी गटांची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलादपूर तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिकारी भरत कदम यांनी दिली.

सत्यमेव जयते फार्मर कप' ही प्रामुख्याने पाणी फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाणारी एक अनोखी स्पर्धा आहे. शेती क्षेत्रातील प्रगती आणि शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले जाते.या स्पर्धेच्या आयोजनामागे शेतकऱ्यांनी वैयक्तिक शेती न करता एकत्र येऊन गट तयार करावेत आणि संघटित होऊन शेती करावी, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

याअंतर्गत सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बियाणे, खते किंवा इतर निविष्ठांची घाऊक खरेदी केल्यामुळे आणि सामूहिक व्यवस्थापनामुळे शेतीचा एकूण उत्पादन खर्च कमी करणे शक्य होते. स्पर्धेत सहभागी शेतकऱ्यांना माती परीक्षण, योग्य बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया आणि एकात्मिक पीक व्यवस्थापन यांसारख्या आधुनिक व वैज्ञानिक पद्धतींचे कृषी तज्ज्ञांकडून मोफत मार्गदर्शन दिले जाते. परिणामी, योग्य तांत्रिक मार्गदर्शनाचा वापर करून पिकांचे उत्पन्न वाढवणे आणि त्याद्वारे शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावून त्यांचे उत्पन्न दुप्पट करणे.नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापरः पाणी, जमीन आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा योग्य व शाश्वत वापर करून पर्यावरणाचा समतोल राखणे. शक्य होते.

या स्पर्धेत महिला शेतकरी गटांना विशेष प्रोत्साहन दिले जाते, ज्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना शेती व्यवस्थापनात नेतृत्व करण्याची संधी मिळते. वेगवेगळ्या गावांमधील शेतकरी गट एकमेकांशी संवाद साधून आपले अनुभव आणि शेतीतील यशस्वी प्रयोग एकमेकांसोबत आदानप्रदान करतात, ज्यामुळे 'शेतकरी ते शेतकरी' ज्ञानाची एक साखळी तयार होते. पारंपारिक शेतीला आधुनिक, शाश्वत आणि फायदेशीर व्यवसायात बदलण्यासाठी आणि शेतकऱ्यांमध्ये एकीची भावना निर्माण करण्यासाठी या 'फार्मर कप' स्पर्धेचे आयोजन केले जाते.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केल्या जाणाऱ्या 'सत्यमेव जयते फार्मर कप' स्पर्धेसाठीची पारितोषिक रचना विविध स्तरांवर विभागलेली असून राज्य पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्वोत्कृष्ट शेतकरी गटांना प्रथम क्रमांकास ₹५० लाख, द्वितीय क्रमांकासाठी ₹३० लाख, तृतीय क्रमांकासाठी ₹२० लाख असे देण्यात येणार आहे. फार्मर कप स्पर्धेत जिल्हा पातळीवर गटांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रथम क्रमांकासाठी ₹५ लाख, द्वितीय क्रमांकासाठी ₹३ लाख तृतीय क्रमांकासाठी ₹२ लाख तर महिला गटांसाठी विशेष पारितोषिक महिला शेतकऱ्यांच्या सहभागाला आणि त्यांच्या गटशेतीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र बक्षीस ठेवण्यात आले आहे. यात सर्वोत्कृष्ट महिला गटासाठी ₹१० लाख तसेच तालुकास्तरीय पारितोषिके प्रत्येक तालुक्यात प्रथम येणाऱ्या विजेत्या शेतकरी गटाला साधारणपणे ₹१ लाख रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात येते. ही स्पर्धा गटशेतीला प्रोत्साहन देण्यासाठी असून, शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढवणे आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करणे या निकषांवर आधारित मूल्यांकन करून हे पुरस्कार दिले जातात.

पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी, तुर्भे खुर्द, वाकण, आंग्रे कोंड, कालवली, कुडपण बुद्रुक, गांजवणे, देवळे, परसुले, वझरवाडी, आडावळे खुर्द, कणगुले, काटेतळी, कापडेखुर्द, कापडे बुद्रुक, किनेश्वर, कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक, गोलदरा, गोवेले, चरई, चांभारगणी खुर्द, चांभारगणी बुद्रुक, ढवळे, ताम्हाणे, तुर्भे कोंड, तुर्भे बुद्रुक, दाभिळ, धामणदिवी, धारवली, पळचिल, पार्ले, पैठण, बोरघर, बोलावले, भोगाव खुर्द, माटवण, मोरगिरी, मोरसडे, रानवडी बुद्रुक, लोहारे, सडवली, सवाद, साखर आणि हळदुले या गावातील पुरुष व महिला शेतकरी गटांनी भात पिकास प्राधान्य देऊन वझरवाडीतील वझरवाडी शेतकरी गटाने व मोरगिरी येथील रामर्पण गटाने नाचणी, चरई येथे कार्ले वझरवाडी येथे रवळनाथ शेतकरी गटाने भेंडी, दिविलच्या स्वामीनी महिला गटाने तूर पिकाची वैविध्यपूर्ण लागवड केली आहे.

# कर्जतचे अभिनेते प्रदिप गोगटे यांचे चित्रपटसृष्टीत पदार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पुरस्कार विजेते व चित्रपट निर्माते शैलेन्द्र सिंग लिखित आणि दिग्दर्शित 'लाडू' या चित्रपटात कर्जतचे प्रदीप गोगटे प्रमुख अभिनेते म्हणून भूमिका बजावत असून या चित्रपटाद्वारे ते चित्रपट सृष्टीत पदार्पण करीत आहेत.



मराठी चित्रपट 'लाडू' चे अधिकृत पोस्टरचे मुंबईतील प्रभादेवी येथील प्रतिष्ठित पु. ल. देशपांडे अकादमीमध्ये महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. याप्रसंगी सह निर्मात्या नीलम लोहार, प्रमुख अभिनेते प्रदीप गोगटे आणि लेखक व गीतकार यज्ञेश दौंड उपस्थित होते. आगामी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांसाठी मंत्री शेलार यांनी चित्रपटाच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या.

'लाडू' हा शैलेन्द्र सिंग यांचा मराठी दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट असून, भारतीय चित्रपट सृष्टीतील त्यांच्या २५ वर्षांच्या कारकिर्दीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. 'लाडू' ची सहनिर्माती दोन वेळा ऑस्कर पुरस्कार नॉमिनेशन प्राप्त सोनिया नासरी कोल या आहेत. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन शैलेन्द्र सिंग, पटकथा व गीतलेखन यज्ञेश दौंड, छायांकन अर्शद इम्रान, संकलक साहिल सेठ, संगीत मंदार पाटील, ध्वनी जिक्कू जोशी, सहायक दिग्दर्शन हर्षद रणदिवे आणि श्वेता कटारे, कला दिग्दर्शन मनोज चाळके, वेशभूषा प्रार्थना आपटे, रंगभूषा सचिन जाधव यांचे आहे. चित्रपटाच्या सहनिर्मात्या म्हणून निकोल सॉटुंग आणि नीलम लोहार यांनी काम पाहीले आहे.

चंदू हे पात्र साकारत प्रदीप गोगटे यांनी चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली असून, त्यांचा अत्यंत भावस्पर्शी अभिनय जगभरातील प्रेक्षकांशी नक्कीच नाते जोडेल. सहायक भूमिकांमध्ये लिनिता भालेराव, सचिन नवरे, अवधुत चिंतन, वंदना गानू, सुधीर वेदपाठक, प्रवीण भिरंगी, विनायक कराळे तसेच १५० हुन अधिक कलाकारांनी प्रथमच रूपेरी पडद्यावर पदार्पण केले आहे. यापैकी सुमारे ६० कलाकार मराठी नाट्यसृष्टीशी संबंधित आहेत. "लाडू" चे चित्रण मुंबई, ठाणे आणि कर्जत येथे झाले आहे. 'लाडू' हा चित्रपट राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांसाठी पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

'मी ७२ चित्रपटांची निर्मिती केली आहे. हा मी दिग्दर्शित केलेला पहिला मराठी चित्रपट आहे आणि तो इतर सर्व चित्रपटांपेक्षा वेगळ्या प्रकारे माझ्या मनात कायम राहील. प्रदीप गोगटे हे विलक्षण कलाकार आहेत. त्यांच्या शांततेतही संपूर्ण आयुष्य दडलेले आहे.

# सहाण बायपासवरील पाल्हे पूल धोकादायक अवस्थेत; तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागरेवदंडा या जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण मार्गावरच्या सहाण बायपासवरील पाल्हे पूल गेल्या अनेक वर्षांपासून दुरवस्थेत असून, तुटलेले कठडे आणि नुकसानग्रस्त संरक्षण रेलिंगमुळे हा पूल अपघाताला निमंत्रण देत आहे. या मार्गावरून दररोज हजारो दुचाकी, चारचाकी, एसटी बस, शालेय वाहने तसेच अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

पुलाच्या एका बाजूचे लोखंडी कठडे पूर्णपणे तुटले असून काही ठिकाणी रेलिंग वाकून नदीच्या दिशेने झुकलेले दिसत आहे. त्यामुळे वाहनचालकांचा थोडासा जरी तोल गेला किंवा समोरून येणाऱ्या वाहनाला वाट देताना वाहन बाजूला गेले, तरी थेट नदीपात्रात कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. पुलाच्या कडेला तात्पुरत्या स्वरूपात काही लोखंडी पाइप लावण्यात आले असले तरी ते सुरक्षिततेच्या दृष्टीने अपुरे ठरत आहेत.

विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात कमी दृश्यमानतेमुळे या पुलावरील धोका अधिक वाढतो. पुलावर कोणतेही इशारा फलक, परावर्तित चिन्हे किंवा मजबूत सुरक्षा व्यवस्था नसल्याने अपघाताची शक्यता कायम आहे. स्थानिक नागरिकांनी यापूर्वीही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दुरुस्तीची मागणी केली होती. मात्र, अद्यापही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही.

अलिबाग, रेवदंडा, किहीम, चौल, मुरुड आदी किनारपट्टी भागांना जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने पर्यटन हंगामातही या पुलावर वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे पुलाची तातडीने तांत्रिक तपासणी करून तुटलेले कठडे नव्याने उभारणे, मजबूत संरक्षण रेलिंग बसविणे आणि आवश्यक ती दुरुस्ती करणे गरजेचे असल्याची मागणी स्थानिक नागरिक व वाहनचालकांकडून होत आहे.प्रशासनाने कोणतीही मोठी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने या पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.



पान १ वरुन

## महाडच्या राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेतून समतेचा नारा

तसेच २०२७ मध्ये चवदार तळे सत्याग्रहाला १०० वर्षे पूर्ण होत असताना शतकपूर्ती महोत्सव साजरा केला जाणार आहे. यासाठी चवदार तळ्याच्या सुशोभीकरणासाठी ५५ कोटींचा निधी मंजूर झाला असून सामाजिक न्याय विभागाकडून यात २० कोटींचा अधिक निधी देणार असल्याचेही शिरसाट यांनी यावेळी सांगितले.

परिषदेस राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, पद्मश्री दादा इदाते, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार सुनील कांबळे, आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे, विश्वजीत गायकवाड, अश्विनी चव्हाण, महाडचे प्रांताधिकारी पोपट ओमासे, महाड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिषदेला व्यापक प्रतिसाद लाभला. सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांचा जागर करत परिषदेची सांगता झाली.

# मुंबई मराठी पत्रकार संघाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचा विजय

**मुंबई** : मुंबई मराठी पत्रकार संघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीत संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनलने सलग दुसऱ्यांदा दणदणीत विजय मिळवला. विष्णू सोनावणे यांच्या नेतृत्वाखालील निर्भीड पॅनलला पराभव स्वीकारावा लागला.



आझाद मैदान येथील पत्रकार संघाच्या कार्यालयात शनिवारी खेळीमेळीच्या वातावरणात मतदान पार पडले. मतदानानंतर तात्काळ झालेल्या मतमोजणीत परिवर्तन पॅनलने बहुमत मिळवत सर्व प्रमुख पदांवर वर्चस्व राखले. अध्यक्षपदी संदीप चव्हाण, कार्यवाहपदी शैलेंद्र शिर्के, विश्वस्तपदी प्रकाश कुलकर्णी आणि कोषाध्यक्षपदी जगदीश भोवड यांची निवड झाली.

कार्यकारिणी सदस्यपदासाठी झालेल्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे सर्व नऊ उमेदवार विजयी झाले. उपाध्यक्षपदी राजेंद्र हुंजे आणि स्वाती घोसाळकर यांची निवड झाली. कार्यकारिणी सदस्य म्हणून गजानन सावंत ,दिवाकर शेजवळकर, विनोद साळवी, आत्माराम नाटेकर, रजनीश राणे, अंशुमन पोयरेकर, सारंग दर्शने, राजेश खाडे आणि किरीट गोरे हेही विजयी झाले.

# कर्जत तालुक्यात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

**कर्जत : प्रतिनिधी**

देशभर आज पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. कर्जत तालुक्यात ३११ बुथवर लसीकरण मोहीम राबविताना तब्बल १४ हजार ७४९ बालकांना लसीकरण करून घेण्यात आल्याचं माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव यांनी दिली.



राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम कर्जत तालुक्यात राबविण्यात येणार आहे. कर्जत तालुक्यात ३११ बूथ वर ही लसीकरण करण्यात आले. त्यात रेल्वे स्टेशन, बस स्टँड आदी ठिकाणी देखील बूथ उभारण्यात आले होते.तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ३८ उपकेंद्र ,अंगणवाडी केंद्रात देखील बूथ तयार करण्यात आले होते.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ उत्साहात पार पडला. २८ जून राज्यातील सर्व जिल्हा आणि महानगरपालिके मध्ये पल्स पोलिओ दिवस साजरा करण्यात आला.





पनवेल मध्ये महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेवक सुमित झुंजाराव आणि नगरसेविका प्रीती जॉर्ज – म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मोहिमेअंतर्गत पाच वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी पालकांना आपल्या पाल्यांना पोलिओचे दोन थेंब पाजून या राष्ट्रीय मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

पनवेल शहरात कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रुग्णालय प्रशासन, आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

## कारचा भीषण अपघात; चालकाचा जागीच मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**




पनवेल परिसरात भरधाव कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने झालेल्या भीषण अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्ती राजीव कुट्टीपन पी.व्ही. (५४ रा.नवीन पनवेल) हा आपल्या ताब्यातील स्विफ्ट कार घेऊन एअरपोर्ट सर्व्हिस रोडवरून जात होता. दरम्यान, वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावरील डिव्हायडरला जोरदार धडकली. धडकेनंतर कार रस्त्याच्या कडेला असलेल्या मातीच्या ढिगाऱ्यावर पलटी झाली. अपघातात चालकाला गंभीर दुखापत झाली असून त्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. अपघाताचे नेमके कारण समजू शकले नसले तरी भरधाव वेग आणि वाहनावरील नियंत्रण सुटणे हे प्राथमिक कारण असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## बेपत्ता तरुणाचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील खांदेश्वर परिसरातून एक ३३ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अमोल राम भोई (वय ३३ वर्षे) हे ११ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातून बाहेर पडले असून त्यानंतर ते घरी परतलेले नाहीत बेपत्ता व्यक्तीचे वर्णन असे की, उंची सुमारे ५ फूट ५ इंच, रंग सावळा, नाक सरळ, केस काळे व बारीक, डोळे काळे आहेत. डाव्या हातावर पिंपळाच्या झाडाचा टॅटू असून गळ्यात चांदीची साखळी परिधान केलेली आहे.

## आगरी शिक्षण संस्थेत छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी



**पनवेल :** आगरी शिक्षण संस्थेचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खांदा कॉलनी नवीन पनवेल येथे गुरुवार (दि. २५ ) रोजी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी कॉलेजचे प्राचार्य श्री पंकज भगत सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाची प्रस्तावना श्री गणेश नाईक सर यांनी केली.

## पनवेल महानगरपालिकेच्या पोलिओमुक्त अभियानाला प्रतिसाद

**कळंबोली : प्रतिनिधी**

अखंड भारत पोलिओ मुक्त व्हावा यासाठी ग्राम पातळीपासून ते देशपातळीपर्यंत रविवारी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरणव पोलिओ मुक्त अभियान सर्वत्र राबविले गेले पनवेल महापालिकेमधील आरोग्य विभागाच्या अंतर्गत माता व बालसंगोपन विभागातर्फे पनवेल महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी पोलिओ मुक्त अभियानाचे काम युद्ध पातळीवर करण्यात आले या अभियानाला पनवेल मधील नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असल्याचे महापालिकेतील आरोग्य विभाग अंतर्गत माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. गणेश नायर यांनी सांगितले आहे. ज्या बालकांना रविवारी पोलिओ डोस घेणे जमले नाही त्यांच्यासाठी ३ जुलै पर्यंत पोलिओ चे डोस देण्याचे अभियान सुरूच ठेवले जाणार असून



**३९२ बूथ, १००८ कर्मचारी, १०४ सुपरवायझर तैनात**

महानगरपालिका क्षेत्रातील शून्य ते पाच वयोगटातील सर्वच बालकांना पोलिओ डोस देण्याचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी अधिकारी डॉ. गणेश नायर यांनी व्यक्त केला आहे.

अखंड भारत पोलिओ मुक्त व्हावा यासाठी केंद्र सरकारने पोलिओ लसीकरणासाठी विविध उपाय योजना चा अवलंब केलेला आहे. ग्रामपातळीपासून ते देशपातळीपर्यंत पोलिओ डोस हे शून्य ते पाच वयोगटातील मुलांना देण्यासाठी विविध कार्यक्रम या अंतर्गत घेतले जात आहेत.पनवेल महापालिकेच्या वैद्यकीय विभागातील माता व बाल संगोपन विभागाचे अधिकारी डॉ. गणेश नायर यांनी आपल्या हजारो वैद्यकीय सहकाऱ्यांसमवेत पनवेल मधील नोंदणीकृत ६४,१७२ शून्य ते पाच वयोगटातील मुलांना पोलिओचा डोस १००% देऊन संपूर्ण पनवेल लसीकरणाने पोलिओ मुक्त करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला आहे.

यासाठी रविवारी पनवेल महानगरपालिकेच्या क्षेत्रातील ३९२ बूथ मधून १००८ कर्मचारी बालकांना डोस देण्यासाठी कार्यरत झाले होते. या बूथ मधून होणारे कामकाज योग्य रीतीने होते की नाही याची पाहणी करण्यासाठी सुद्धा १०४ सुपरवायझर यांची नियुक्ती ही यावेळी करण्यात आली होती. रविवारी महापालिकेने निर्माण केलेल्या बूथ मधून सायंकाळी पाच ते साडेपाच वाजेपर्यंत पोलिओचे डोस बालकांना देण्यात आले . रविवारी ज्या बालकांना पोलिओ डोस घेणे जमणार नाही. काही मुलं आजारी असतात काही कामानिमित्त पालकां समवेत बाहेर गेलेले असतात.या बालकांसाठी २९ जून ते ३ जुलै पर्यंत पुन्हा पोलिओ डोस देण्याचे अभियान राबविण्यात येणार आहे. यावेळी नेमण्यात आलेले कर्मचारी हे विविध सोसायटी वसाहती मधून घरोघरी जाऊन कोणी पोलिओ डोस घेण्याचे राहिले आहे का याची खातरजमा करून पनवेल महानगर क्षेत्रातील पोलिओ डोस देण्याचे १००% उद्दिष्ट हे पूर्ण करण्याचा निर्धार माता व बालसंगोपन अधिकारी गणेश नायर यांनी पुढारीशी बोलताना व्यक्त केला आहे.

## शिवसेनेच्या वर्धापनदिनानिमित्त वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना छत्री व वह्यावाटप

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त पनवेल शहर शिवसेनेतर्फे पनवेल म.न.पा. दगडी शाळा क्रं २ येथे वृक्षारोपण तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोफत छत्री व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना सल्लागार रमेश गुडेकर यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वह्यांचे तर शिवसेना समन्वयक राहुल गोगटे यांच्या माध्यमातून छत्रीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेनेचे राहुल गोगटे यांनी केले होते.



यावेळी शिवसेना जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, नगरसेवक,महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, शहरप्रमुख प्रसाद सोनवणे, शहर संघटक अभिजित साखरे, उपशहर प्रमुख शैलेश जगनाडे, अर्जुन परदेशी, शहर उपसंघटक खंडेश धनावडे,शाखा प्रमुख गुलाब बागवान,विक्रम पाटणकर,जेष्ठ शिवसैनिक सुजन मुसलोंडकर,आयोजक शिवसेना समन्वयक राहुल गोगटे,तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुजित म्हात्रे,शिक्षक वैभव पाटील, वैशाली सावळे, अर्चना माने,स्वाती पाटील आदींचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाप्रसंगी बोलताना नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी राहुल गोगटे यांच्या आयोजनाचे कौतुक केले तसेच गोगटे हे कुठल्याही पदाची, नावाची अपेक्षा न ठेवता दरवर्षी हा कार्यक्रम करत असतात, त्यामुळे निश्चितच गरजू विद्यार्थ्यांना याचा लाभ होतो, शिवसेनेच्या ८०% समाजकारण २०% राजकारण या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अपेक्षित कार्य या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.यावेळी बोलताना शिवसेना जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर व शिक्षकवृंद यांनी देखील राहुल गोगटे यांच्या कामाचे कौतुक करून यापुढे देखील असेच सहकार्य शाळेस करण्याचे आवाहन केले.

## कळंबोली मंडळाच्या वतीने २५ जून हा 'आणीबाणीचा काळा दिवस' साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशावर लादण्यात आलेल्या आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टी, कळंबोली मंडळाच्या वतीने २५ जून हा दिवस 'आणीबाणीचा काळा दिवस' म्हणून गांभीर्यपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे संयोजक भाजप भटके-विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आणीबाणीच्या काळात लोकशाहीवर आलेले संकट, संविधानिक मूल्यांचे झालेले उल्लंघन, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आलेली गदा आणि त्या काळातील अन्याय-अत्याचार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.



तसेच लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या लोकशाहीवादी नेत्यांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

यावेळी कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांनीही आणीबाणीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर उपस्थितांना मार्गदर्शन करत लोकशाही मूल्यांचे जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला नगरसेविका मोनिका महानवर, बायजा बारगजे, दमयंती भोईर, नगरसेवक राजेंद्र शर्मा, मंडळ सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ नशामुक्ती दिनानिमित्त पनवेलमध्ये जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नशा-मुक्ती व सायबर गुन्हेगारीबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम याकूब बेग ज्युनियर कॉलेज, मनपा पीर करमअली शहा उर्दू स्कूल, पीपल एज्युकेशन सोसायटीचे इंग्लिश ज्युनियर कॉलेज तसेच मायनॉरिटी स्कूल येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत तसेच वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार, पोलीस उपनिरीक्षक देवकाते, महिला पोलीस उपनिरीक्षक पूजा कर्चे व अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना PPT आणि माहितीपूर्ण व्हिडिओच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला सुमारे ३५० ते ४०० विद्यार्थी-विद्यार्थिनी, संचालक मंडळाचे सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सकाळी १०.३० ते ११.५० या वेळेत कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने सांगण्यात आले.



## टपाल नाक्यावरील धोकादायक विद्युत खांब बदलला; संभाव्य दुर्घटना टळली

**पनवेल : वार्ताहर**

टपाल नाका परिसरातील एमएसईबी कार्यालयाच्या मागील बाजूस असलेला राणा कन्स्ट्रक्शन ट्रान्सफॉर्मर सेंटर डीपी स्ट्रक्चरचा विद्युत खांब अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत पोहोचला होता. खांब पूर्णपणे सडल्याने तो कधीही कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्पर पाठपुराव्यामुळे महावितरणने अवघ्या २४ तासांत नवीन विद्युत खांब उभारून संभाव्य जीवितहानी टाळली.

रोहिदास वाड्यातील रहिवासी सचिन उरणकर आणि जयेश कल्याणकर यांनी धोकादायक खांबाची पाहणी करून त्याचे छायाचित्र व व्हिडिओ तयार केले. त्यानंतर त्यांनी नगरसेवक राजू सोनी, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी आणि मंदार देसाई यांच्याशी संपर्क साधून तातडीने कारवाईची मागणी केली. तक्रारीची दखल घेत राजू सोनी, पवन सोनी आणि मंदार देसाई यांनी महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता सातपुते यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले. यानंतर अतिरिक्त कार्यकारी अभियंता सातपुते यांनी तातडीने संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. महावितरणच्या पथकाने युद्धपातळीवर काम करत अवघ्या एका दिवसात जुना व सडलेला विद्युत खांब हटवून त्या ठिकाणी नवीन खांब उभारला.

## कळंबोलीत पोलिओ लसीकरण दिन साजरा

**पनवेल : वार्ताहर**

आज 'पोलिओ लसीकरण दिना' निमित्त कळंबोली सेक्टर १० येथील युपीएचसी सेंटरमध्ये विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचे उद्घाटन नगरसेविका व आरोग्य समिती अध्यक्षा सौ. बायजा बबन बारगजे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी सौ. बायजा बारगजे म्हणाल्या, "पोलिओमुक्त भारत घडवण्यासाठी ० ते ५ वयोगटातील सर्व मुलांना पोलिओची २ थेंब देणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना पोलिओ लस देण्यास कसलीही हेळसांड करू नये. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे." उद्घाटन प्रसंगी नगरसेवक रामदास शेवाळे, भटके विमुक्त मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, युपीएचसीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल पाटील तसेच केंद्रातील इतर डॉक्टर, आरोग्य कर्मचारी व आशा वर्कर्स उपस्थित होत्या.

डॉ. अनिल पाटील यांनी पोलिओ लसीकरणाचे महत्त्व व फायदे पालकांना समजावून सांगितले. युपीएचसी स्टाफने केंद्रात येणाऱ्या सर्व लहान मुलांना पोलिओच्या २ थेंब पाजल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सौ. बायजा बारगजे यांनी आरोग्य कर्मचारी व आशा वर्कर्सच्या मेहनतीचे कौतुक केले. "पोलिओमुक्त कळंबोली" हे आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.


## संपादकीय

# पावसाचे बदलते स्वरूप

हवामान बदल हा आता केवळ शास्त्रज्ञांच्या अभ्यासाचा विषय राहिलेला नाही, तर तो प्रत्येकाच्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनला आहे. ऋतुचक्रातील अनिश्चितता, पावसाचे बदलते स्वरूप आणि वाढत्या नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतीपासून अर्थव्यवस्थेपर्यंत सर्वच क्षेत्रांवर परिणाम होत आहे. निसर्गाच्या या बदलत्या संकेतांकडे गांभीर्याने पाहून दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची हीच योग्य वेळ आहे.

**एकेकाळी भारतीय ऋतुचक्राची एक ठरलेली शिस्त होती. उन्हाळ्यानंतर पावसाळा, त्यानंतर हिवाळा आणि पुन्हा उन्हाळा असे चक्र साधारणपणे निश्चित वेळेनुसार फिरत असे. शेतकरी पेरणीची वेळ ठरवत, जलसाठ्याचे नियोजन होत असे आणि सामान्य नागरिकही ऋतूंशी जुळवून घेत आपले दैनंदिन जीवन आखत असत, मात्र गेल्या काही वर्षांत या नैसर्गिक चक्रात मोठे बदल दिसू लागले आहेत. पावसाचे आगमन, त्याची तीव्रता, कालावधी आणि वितरण या सर्व बाबींमध्ये अनिश्चितता वाढली आहे. परिणामी निसर्गाचा समतोल बिघडत असून त्याचे दूरगामी परिणाम समाजाच्या प्रत्येक घटकावर होत आहेत. यंदाच्याही पावसाळ्याकडे पाहिले, तर ही अनिश्चितता स्पष्टपणे जाणवते. पूर्वी चार महिन्यांत सम प्रमाणात पडणारा पाऊस आता कधी मुसळधार कोसळतो, तर कधी गायब होतो. या बदलामागे हवामान बदल हे प्रमुख कारण मानले जात आहे. औद्योगिकीकरण, जंगलांची मोठ्या प्रमाणावर होणारी तोड, वाढते प्रदूषण, जीवाश्म इंधनांचा वाढता वापर आणि हरितगृह वायूंचे वाढते उत्सर्जन यामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. त्याचा परिणाम जागतिक वातावरणावर होत असून मान्सूनच्या पद्धतीतही मोठे बदल होत आहेत. पूर्वी तुलनेने स्थिर असलेली हवामान व्यवस्था आता अधिक अस्थिर आणि टोकाची होत चालली आहे. या बदलाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. शेती आजही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. वेळेवर पाऊस न झाल्यास पेरण्या उशिरा होतात, तर अतिवृष्टीमुळे उगवलेली पिके वाहून जातात किंवा सडतात. मध्येच खंड पडल्यास पिकांची वाढ खुंटते. त्यामुळे उत्पादनात घट येते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. कर्जबाजारीपणा वाढतो, आर्थिक अस्थिरता निर्माण होते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे गंभीर परिणाम दिसून येतात. पावसाच्या या अनियमिततेचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित नाही. शहरांमध्ये काही तासांच्या मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय होतात, वाहतूक व्यवस्था कोलमडते आणि नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागते. दुसरीकडे पावसात मोठे खंड पडल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. धरणे भरत नाहीत, भूजल पातळी खालावते आणि जलव्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे राहते. जैवविविधतेवरही या बदलाचे गंभीर परिणाम होत आहेत. अनेक पक्षी, प्राणी आणि वनस्पतींचे जीवनचक्र विशिष्ट ऋतूंवर अवलंबून असते. ऋतूंचा समतोल बिघडल्याने त्यांचे स्थलांतर, प्रजनन आणि अन्नसाखळीवर परिणाम होत आहे. अनेक भागांतील जंगलांमध्ये आगीचे प्रमाण वाढत आहे, तर काही भागांत अतिवृष्टीमुळे मृदा धूप आणि भूस्खलनाच्या घटना वाढल्या आहेत. या परिस्थितीत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी शासन, उद्योग, शेतकरी, संशोधक आणि सामान्य नागरिक अशा सर्वांनी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. जलसंधारण, वृक्षलागवड, जलस्रोतांचे संवर्धन, सेंद्रिय व शाश्वत शेतीला प्रोत्साहन, तंत्रज्ञानाचा वापर, आधुनिक हवामान अंदाज प्रणालीचा प्रभावी वापर आणि हवामानानुसार पीक नियोजन यावर अधिक भर द्यावा लागेल. जलसाठ्यांची क्षमता वाढविणे, नद्यांचे पुनरुज्जीवन आणि पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजनबद्ध व्यवस्थापन ही काळाची गरज आहे.**

# काळाच्या वाळूत कोरलेली पावले : इतिहासाच्या पाऊलखुणा



मानवी संस्कृती ही नदीसारखी आहे. तिचा प्रवाह अखंड वाहतो, वाटेत अनेक वळणे घेतो, नवे प्रवाह सामावून घेतो, पण मूळ उगमाशी असलेले नाते कधीच तोडत नाही. आपल्या आजच्या पावलांचे ठसे उद्याच्या इतिहासात उमटणार आहेत, तसेच कालच्या पावलांच्या खुणा आजही आपल्या वाटा दाखवत असतात. महाराष्ट्राच्या मातीला तर इतिहासाच्या अशा असंख्य पाऊलखुणा लाभल्या आहेत. कधी त्या सह्याद्रीच्या कड्याकपारीत दडलेल्या आहेत, कधी गोदावरीच्या डोहात प्रतिबिंबित झाल्या आहेत, तर कधी लोकांच्या बोलीभाषेत, सण-उत्सवात जिवंत राहिल्या आहेत.

२०२६ सालच्या जून महिन्यात जेव्हा आपण मागे वळून पाहतो, तेव्हा लक्षात येते की इतिहास हा केवळ पुस्तकात बंदिस्त नसतो. तो आपल्या रोजच्या जगण्यात श्वास घेत असतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे फिफा विश्वचषक २०२६ च्या निमित्ताने कोल्हापूरच्या फुटबॉल संस्कृतीची जागतिक पातळीवर झालेली दखल. फिफाने अधिकृतपणे मराठीतून, कोल्हापुरी बोलीतून पोस्ट केल्या. "रोनाल्डोचा विषय लय हार्ड हाय" हे वाक्य केवळ एक कॅप्शन नव्हते. ती शंभर वर्ष जुन्या फुटबॉल परंपरेला मिळालेली जागतिक पोचपावती होती. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात रुजलेले फुटबॉलचे बीज आज जागतिक व्यासपीठावर बहरले. हीच ती इतिहासाची पाऊलखूण. काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, पण शाहू स्टेडियमवरची ती प्रेक्षकांची गर्दी, तालमीतला तो जोश आजही तसाच आहे.

इतिहासाच्या पाऊलखुणा शोधायला फार लांब जावे लागत नाही. आपल्या गावाच्या वेशीवरचा जुना वड, मंदिराच्या पायरीवरचे झिजलेले दगड, आजीच्या तोंडची एखादी म्हण, हे सगळे इतिहासच सांगत असतात. रायगडावर उभे राहिल्यावर शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारे बुरुज दिसतात. प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखानाच्या भेटीची आठवण जागी होते. सिंधुदुर्गाच्या तटबंदीवर उभे राहून आरमाराच्या गर्जना ऐकू येतात. या वास्तू मुकेपणाने आपला इतिहास सांगत असतात. त्यांना बोलते करण्यासाठी फक्त आपल्याला कान द्यावे लागतात. इतिहास म्हणजे केवळ राजे-महाराजांच्या लढाया नव्हेत. तो आहे सामान्य माणसाच्या जगण्याचा आलेख. वर्ध्याच्या सेवाग्राममध्ये गांधीजींची झोपडी आजही साधेपणाची शिकवण देते. पवनार येथील परंधाम आश्रमात विनोबांच्या भूदान चळवळीची स्पंदने जाणवतात. साने गुरुजींच्या अंमळनेरमधील घरापुढे उभे राहिले की 'श्यामची आई' मधला तो मायेचा ओलावा मनाला स्पर्शून जातो. ही स्थळे केवळ पर्यटनस्थळे नाहीत. ती विचारांची विद्यापीठे आहेत.

महाराष्ट्राच्या लोककलांमध्येही इतिहासाचे पदर गुंफलेले आहेत. पोवाड्यातून शिवछत्रपतींचा पराक्रम आजही गायला जातो. भारुडातून संत एकनाथांचे प्रबोधन आजही घरोघरी पोहोचते. लावणीच्या ठेक्यावर रसिकांच्या मनातले भाव आजही तसेच उचंबळून येतात. कोकणातला दशावतार, विदर्भातला खडी गंमत, पश्चिम महाराष्ट्रातली वगनाट्ये ही केवळ करमणुकीची साधने नाहीत. ती आपल्या सामाजिक इतिहासाची जिवंत दस्तऐवज आहेत. २०२६ मध्येही गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत ढोल-ताशांचा गजर त्याच दिमाखात ऐकू येतो. वारीतल्या दिंड्या त्याच तन्मयतेने पंढरीची वाट चालत आहेत. काळ बदलला तरी परंपरेचा गाभा कायम आहे. हीच इतिहासाची ताकद.

आज २०२६ मध्ये तंत्रज्ञानाने इतिहास जतन करण्याची नवी दालने खुली केली आहेत. राज्य पुरातत्व विभागाने महाराष्ट्रातील ३५० हून अधिक किल्ल्यांचे 3D डिजिटल डॉक्युमेंटेशन पूर्ण केले आहे. मोबाईलवर एक क्लिक केले की रायगडाच्या महादरवाज्यापासून ते जगदीश्वराच्या मंदिरापर्यंतचा आभासी प्रवास करता येतो. शाळकरी मुलांना आता केवळ चित्रात नाही, तर व्हर्च्युअल रिॲलिटीच्या माध्यमातून शिवकाल अनुभवता येतो. लेण्यांमधील शिल्पे, मंदिरांवरील कोरीव काम, जुनी हस्तलिखिते या सगळ्यांचे डिजिटायझेशन सुरू आहे.

जूनमध्ये 'महाराष्ट्र डिजिटल हेरिटेज मिशन'चा दुसरा टप्पा सुरू झाला. सर्व जिल्ह्यांतील १,०००हून अधिक ऐतिहासिक वास्तू, गढी, वाडे यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. २०२६ सालचा महाराष्ट्र जेव्हा २०४७ सालच्या विकसित भारताकडे वाटचाल करत आहे, तेव्हा या पाऊलखुणा आपल्याला दिशा देणाऱ्या दीपस्तंभासारख्या आहेत. (साभार इंटरनेट)

# मराठी नाटककार, विनोदकार श्रीपाद कोल्हटकर

मराठी नाटककार, विनोदकार व वाङ्मयसमीक्षक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म २९ जून १८७१ रोजी विदर्भातील बुलढाण्यात झाला. पुणे आणि मुंबई येथे बीए, एलएलबीपर्यंतचे शिक्षण झाले. व्यवसाय वकिलीचा असून त्यांनी आपल्या वाङ्मयसेवेचा आरंभ संगीत विक्रमशशिकला नाटकावरील टीकालेखाने (१८९३) केला.

संगीत वीरतनय (१८९६) हे त्यांचे पहिले नाटक. त्यानंतर त्यांनी मूकनायक (आवृ. तिसरी, १९२२, प्रथम प्रयोग १९०१), गुप्तमंजूष (१९०३), मतिविकार (१९०७), प्रेमशोधन (१९११), वधूपरीक्षा (१९१४), सहचारिणी (१९१८), जन्मरहस्य (१९१८), परिवर्तन (आवृ. दुसरी, १९२३), शिवपावित्र्य (१९२४), श्रमसाफल्य (१९२९) आणि मायाविवाह (१९४६) ही नाटके लिहिली. उपर्युक्त बारा नाटकांपैकी पहिली आठच रंगभूमीवर आली. 'साक्षीदार' हा त्यांचा पहिला विनोदी लेख विविधज्ञानविस्तारात प्रसिद्ध झाला (१९०२). सुदाम्याचे पोहे अर्थात अठरा धान्यांचे कडबोळे (१९१०) हा त्यांच्या विनोदी लेखांचा संग्रह. त्याची तिसरी आवृत्ती सुदाम्याचे पोहे-



अर्थात साहित्य बत्तिशी ह्या नावाने प्रसिद्ध झाली (१९२३). त्यांचे समीक्षालेख, अध्यक्षीय भाषणे, निबंध कोल्हटकरांचा लेखसंग्रह (१९३२) ह्या नावाने प्रसिद्ध झालेले आहेत. दुटप्पी की दुहेरी (१९२५) आणि श्यामसुंदर (१९२५) या दोन कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांनी काही लघुकथाही लिहिल्या आहेत. गीतोपायन (१९२३) हा त्यांचा कवितासंग्रह. 'बहु असोत सुंदर संपन्न' या सुप्रसिद्ध महाराष्ट्रगीताचे ते जनक आहेत. साधारणपणे १९२०पर्यंतच्या त्यांच्या जीवनाचा आढावा त्यांनी आपल्या आत्मवृत्तात (१९३५) घेतला आहे. भारतीय ज्योतिर्गणित (१९१३) या ग्रंथातून त्यांच्या ज्योतिर्गणितविषयक व्यासंगाचा प्रत्यय येतो.

कोल्हटकरांचे नाव घेतले जाते ते मुख्यतः नाटककार, विनोदकार आणि वाङ्मयसमीक्षक म्हणून. त्यांची नाटके जरी त्यांच्या हयातीतच रंगभूमीवर नाहीशी झाली, तरी त्यांचा मराठी नाट्यलेखनावर झालेला परिणाम दुर्लक्षणीय नाही.


साहित्यसेवेबद्दल त्यांना १९२२ साली पुण्यास भरलेल्या द्वितीय कविसंमेलनाचे अध्यक्षपद व १९२७ साली पुण्यासच भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या बाराव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद देण्यात आले. सांगली येथे भरलेल्या तृतीय ज्योतिष संमेलनाचेही (१९२०) ते अध्यक्ष होते. पुणे येथे ते निधन पावले.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

## तुमचा अँड्रॉईड फोन होऊ शकतो हॅक?




इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम (CERT-In)ने अलीकडेच एक इशारा दिला आहे आणि हा इशारा विशेषतः अँड्रॉइड युजर्ससाठी आहे. मग तुम्ही अँड्रॉइड फोन वापरत असाल किंवा अँड्रॉइड टॅबलेट... हे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे. CERT-In इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येते.

CERT-Inनुसार Android OSमध्ये अनेक त्रुटी आढळल्या आहेत आणि याचा वापर करून हॅकर्स तुमच्या फोनमधून तुमची महत्त्वाची माहिती आणि डेटा काढू शकतात. अशा परिस्थितीत अँड्रॉइडच्या कोणत्या व्हर्जनला धोका आहे हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. यात Android 12, Android 12L, Android 13 आणि Android 14चा समावेश आहे.


CERT-In मते, या समस्या अँड्रॉइडच्या फ्रेमवर्क, सिस्टम, गुगल प्ले सिस्टम अपडेट्स, कर्नल, आर्म कंपोनेंटस, इमॅजिनेशन टेक्नॉलॉजी आणि क्वालकॉमच्या क्लोज-सोर्स कंपोनेंट्समधील त्रुटींमुळे आहेत.

या त्रुटींमुळे जर कोणत्याही हॅकरला तुमचा फोन हॅक करायचा असेल, तर त्याच्यासाठी ते खूप सोपे होईल. तुमचा फोन हॅक केल्यानंतर हॅकर तुमच्या फोनमधील डेटा चोरू शकतो आणि तो डेटा डार्क वेबवर विकू शकतो. यासोबतच हॅकर तुमच्या फोनमध्ये डिनायल ऑफ सर्व्हिस कंडिशनदेखील सक्रिय करू शकतो. त्यामुळे CERT-Inने युजर्सना लवकरात लवकर सिक्युरिटी पॅच अपडेट करण्यास सांगितले आहे.

फोन अपडेट करण्यासाठी या स्टेप्स करा फॉलो

* सर्वात आधी तुमच्या फोनची Setting ओपन करा.
* त्यात सॉफ्टवेअर अपडेट्स शोधा आणि ते उघडा.
* यानंतर Check for Updatesवर क्लिक करा.
* जर Update available म्हणजे अपडेट उपलब्ध असेल तर ते डाउनलोड करा.
* अपडेट डाउनलोड केल्यानंतर ते इन्स्टॉल करा.
* इन्स्टॉल केल्यानंतर फोन रीस्टार्ट करा. यानंतर तुमचा फोन पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित होईल.

# ज्येष्ठ लेखक दि. बा. मोकाशी



**निमित्त**

मराठी नवकथेत मोलाची भर घालणारे ज्येष्ठ लेखक दिगंबर बाळकृष्ण मोकाशी उर्फ दि.बा. मोकाशी यांचा जन्म २७ नोव्हेंबर १९१५ उरण येथे झाला. दि.बा. मोकाशी हे विसाव्या शतकातल्या श्रेष्ठ मराठी लेखकांपैकी एक होते. मराठी नवकथेत मोलाची भर घालणाऱ्या प्रारंभीच्या आघाडीच्या कथाकारांत त्यांची गणना होते. दि.बा. मोकाशी हे १९४०नंतर नवकथेत झळकणारे महत्त्वाचे नाव. तीन कादंबऱ्या, तीन ललित व प्रवासवर्णनपर लेखसंग्रह, सात कथासंग्रह आणि पाच बालवाङ्मयपर पुस्तके असा त्यांचा भरगच्च साहित्यसंभार आहे.


लामणदिवा हा १९४७ साली प्रसिद्ध झालेला मोकाशी यांचा हा पहिलाच कथासंग्रह. रोजच्या जीवनातल्या साध्यासुध्या प्रसंगांतून आकारणारी लेखकाची कथा सौम्य आणि संयत प्रकृतीची आहे. या पुस्तकात प्रारंभी 'पहिली पावले' या शीर्षकाखाली त्यांनी आपल्या लेखनाच्या सुरुवातीच्या कालखंडाविषयी लिहिले आहे. तेही कथेइतकेच रंजक आहे. माणूस साप्ताहिकात ७९-८० च्या कालखंडात प्रसिध्द झालेले, 'संध्याकाळचे पुणे' हे पुण्यातील सांस्कृतिक हालचालींचे दर्शन घडवणारे लेख चांगलेच गाजले. पुण्यात रोज घडणाऱ्या उपक्रमांबद्दल, व्यक्तींबद्दल आणी संस्थांबद्दल अत्यंत रसिकतेने लिहिलेले हे लेख आहेत. प्रसन्नता आणि निर्व्याजता, चिंतनशीलता आणि ताजेपणा ही मोकाशी यांच्या साहित्यातील वैशिष्ट्ये या लेखांमध्ये आढळतील. 'आम्ही मराठी माणसं' हा १३ वैशिष्ट्यपूर्ण कथांचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाला. आपल्या अवतीभवतीच्या माणसांचे नितळ विश्व सरळ साध्या पध्दतीने उभे करावे, ते नाट्यपूर्ण आणि शैलीदार पध्दतीने मांडण्यात त्यामागच्या वास्तवाची हानी होते, असे त्यांना वाटे. या संग्रहातील हलक्या-फुलक्या कथा सामान्यांच्या सुप्तासुप्त भावनांचे खेळकर भूमिकेतून चित्र रेखाटणाऱ्या आहेत.

त्यांच्या निधनानंतर साहित्य अकादमीने १९८८मध्ये 'दि. बा. मोकाशी यांची कथा' (निवडक कथांचा संग्रह) हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्याच्या प्रस्तावनेत मोकाशींच्या इतर साहित्याचा परामर्श घेताना 'कामसूत्रकार वात्स्यायन' या कादंबरीचा मात्र उल्लेख नाही. मुंबई विद्यापीठातील मराठी विभागाच्या प्रमुख प्रा. सरोजिनी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली माधुरी पणशीकर यांनी मोकाशी यांच्या साहित्यावर प्रबंध लिहून डॉक्टरेट घेतली. दि. बा. मोकाशी यांनी लामणदिवा, वणवा मिळून ११ कथासंग्रह, देव चालले, आनंद ओवरी या कादंबऱ्या, तसेच पालखी, अठरा लक्ष पावलं अशी प्रवासवर्णने, संध्याकाळचे पुणे (ललित), रेडिओदुरुस्ती व्यवसाया-बद्दलचे पुस्तक व बालसाहित्यदेखील त्यांनी लिहिले.

'अठरा लक्ष पावलं'मध्ये त्यांनी प्रवासवर्णनातून समाजजीवनाचा शोध घेतला. त्यांच्या 'आनंद ओवरी' या संत तुकारामांच्या जीवनावरील कादंबरीचे अमेरिकन अभ्यासक जेफ ब्रेकेट यांनी इंग्रजीत भाषांतर करून ते 'ट्विटर'वर ठेवले आहे. त्यांच्या इतरही अनेक पुस्तकांची हिंदी व इंग्रजी भाषांतरे झाली आहेत. त्यांच्या 'पालखी' या पुस्तकातून पंढरीच्या वारीवर विपुल लेखन केलंय. 'कामसूत्रकार वात्स्यायन' ही त्यांची १९७८ मध्ये प्रकाशित झालेली चरित्रात्मक कादंबरी. त्यांच्या या कादंबरीची मात्र फारशी दखल घेतली गेली नाही. जानेवारी २०१४ मध्ये त्यांची कन्या ज्योती कानेटकर यांनी या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर अमेझॉनवर टाकले आहे. दि. बा. मोकाशी यांचे २९ जून १९८१ रोजी निधन झाले.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## जाणून घ्या... जेवण व झोप यामध्ये किती अंतर असावे



रोजची धावपळ आणि कामाचा थकवा त्यामुळे बऱ्याचदा काही लोकांना रात्री जेवण केल्यानंतर लगेचच झोपी जाण्याची सवय असते. झोप पूर्ण करण्याच्या प्रयत्नात ते जेवण केल्यानंतर लगेच ढाराढूर झोपतात. मस्त जेवणावर ताव मारून खुशाल झोपायचं म्हणजे स्वर्गसुख असा त्यांचा समज आहे. रिपोर्टनुसार असं करणं चुकीच आहेच शिवाय आपल्या आरोग्यावर त्याचे नकळतपणे दुष्परिणाम होतात.

तज्ज्ञांच्या मते, जेवल्यानंतर लगेच झोप येणे किंवा झोपी जाणे हे आरोग्याच्या दृष्टीने अतिशय वाईट आहे. त्यामुळे पचनक्रियेचा वेग मंदावतो तसेच लठ्ठपणा वाढतो.

या गंभीर समस्या उद्भवू शकतात-

१) पचनक्रिया कमजोर होते- जेवल्यानंतर लगेचच झोपल्याने त्याचा परिणाम पचनक्रियेवर होतो. शिवाय त्यामुळे अन्नाचे पचन मंद होते आणि पोटभर जेवून लगेच झोपल्यास अन्नाचे पचन व्यवस्थित होत नाही. एवढेच नाही तर त्यामुळे गॅस आणि ॲसिडिटी होऊ शकते.

२) अनिद्रा-रात्री झोपल्यानंतर आपल्या शरीरात आम्लपित्त तयार होते. त्यामुळे आंबट ढेकर, छातीत जळजळ होते. त्यामुळे आपली झोपमोड होऊ शकते.

३) वजन वाढते-शरीरातील कॅलरीज बर्न होत नसल्याने वजन वाढण्याची समस्या भेडसावते. आरोग्यतज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार रात्रीचे जेवण केल्यानंतर जवळपास अर्धा तास मोकळ्या हवेत फेरफटका मारावा. त्यामुळे अन्न पचण्यास मदत होते.

**जेवणे आणि झोपणे यात नेमके किती तासांचे अंतर असावे?**

न्यूट्रिशननिस्टच्या मते, रात्री जेवण केल्यानंतर ३ तासानंतरच झोपावे. तसेच विशेष म्हणज जर आपण हेव्ही म्हणजेच जास्तच तिखट, तेलकट, मसालेदार पदार्थ खाल्ले असतील तर तीन तासांपूर्वी अजिबात झोपू नये तसेच जेवल्यानंतर काही वेळ वज्रासनात बसावे. त्यामुळे अन्न पचण्यास मदत होते आणि आम्लपित्ताचा त्रास होत नाही. याचबरोबर रात्रीचे जेवण जरा हलके असावे.

# म्हाडा वसाहतीतील रस्त्याचे नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन



**पेण : प्रतिनिधी**

आमदार रविंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी पेण शहरात विविध प्रकारच्या विकासकामांचा प्रारंभ केला असून आज त्यांनी शहरातील म्हाडा वसाहतीमधील सिमेंट काँक्रिटच्या मुख्य रस्त्याचे भूमिपूजन केले. यावेळी त्यांनी बोलताना म्हाडा वसाहत मधील सर्व नागरिकांचा सहकार्य आणि पाठिंबा मिळत आहे, हीच खरी आमची येथील विकासकामे करण्याची ताकद असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या सोबत नगरसेविका तथा महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांसह म्हाडा वसाहतीतील नागरिक आणि प्रभागातील कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार रविंद्र पाटील यांच्या माध्यमातून पेण शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असल्याने पेण शहरातील सर्वच भागात नाले, छोटी मोठी गटारे, रस्ते, सोलर दिवे, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, विविध प्रकारचे स्मारके, आंबेडकर भवन आदी प्रकारची कामे मोठ्या प्रमाणात सुरू असून आज नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या हस्ते म्हाडा वसाहत येथील मुख्य रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी बोलताना आमदार रविंद्र पाटील हे पेण शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत असल्याने आम्हाला ही कामे करता येत असून म्हाडा वसाहती मधील नागरिकांचे सहकार्य आणि पाठिंबा हीच आमची विकास कामे करण्याची ताकद असल्याचे नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले.

# आजचे विद्यार्थी हेच देशाचे खरे भविष्य

## वैकुंठ पाटील यांचे प्रतिपादन



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका मराठा समाजाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी दत्तक पालक योजने अंतर्गत रविवारी आयोजित समारंभात तालुक्यातील विविध समाजातील ५० गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, दप्तर, वह्या, पुस्तके, छत्री तसेच शैक्षणिक गरजांच्या आवश्यक वस्तूंचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. समाजाच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मुक्तकंठाने कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुधागड तालुका मराठा समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर होते. प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठशेठ पाटील, दक्षिण रायगड महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा शर्मिला वैकुंठ पाटील, सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीता पालरेचा, चंद्रसेनीय कायस्थप्रभू समाजाचे अध्यक्ष अनुपम कुलकर्णी, जागतिक मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर पवार, युवा उद्योजक संजय सागळे, कार्याध्यक्ष बळीराम निंबाळकर, सरचिटणीस सुजित बारसकर, खजिनदार योगेश मोरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील म्हणाले, "आजचे विद्यार्थी हेच देशाचे भविष्य आहेत. त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. सुधागड तालुका मराठा समाजाने सुरू केलेले हे सेवासूत्र भविष्यात अधिक व्यापक होईल. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे कार्य केले पाहिजे." युवकांसाठी स्टेडियम, ग्रंथालय, डिजिटल जिमसह आधुनिक युवा संकुल उभारण्यासाठी कोट्यवधी रुपयांची विकासकामे मंजूर करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

उपस्थितांनी या कार्याचे विशेष कौतुक केले. अशा लोकोपयोगी उपक्रमांना भविष्यातही सर्वतोपरी सहकार्य आणि मदत करण्यासाठी आम्ही नेहमीच समाजाच्या पाठीशी उभे राहू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विशेष म्हणजे ही विद्यार्थी दत्तक पालक योजना केवळ मराठा समाजापुरती मर्यादित नसून तालुक्यातील सर्व समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे. आतापर्यंत ५० विद्यार्थ्यांचा या योजनेत समावेश करण्यात आला असून त्यांच्या शिक्षणात आर्थिक अडचणी येऊ नयेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

समाजातील दानशूर व्यक्ती, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम अधिकाधिक व्यापक होत असून, शिक्षणाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आधार देण्याचे कार्य सुधागड तालुका मराठा समाज सातत्याने करत असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.





**अलिबाग : वटपौर्णिमेचे साहित्य खरेदीसाठी रविवारी अलिबागची बाजारपेठ फुलली होती. वटपौर्णिमेनिमित्त विविध फळे, पूजेचे साहित्याच्या खरेदीसाठी बाजारपेठेत महिलांनी गर्दी केली होती.** (छाया : जितू शिगवण)

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

राम प्रहर

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.

दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१

E-mail: conteeg.mlwb-mh@gov.in, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

**नोटीस**

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थेमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या **दिनांक ३१ डिसेंबर २०२२** पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२६** पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा. संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नाव | रक्कम |
|---|---|
| **THANE** | |
| GHARDA CHEMICALS PVT LTD | 420665.5 |
| GALAXY SURFACTANTS PVT.LTD. | 34827 |
| HAWKINS COOKERS LIMITED | 197162 |
| MEYER ORGANICS PVT.LTD. | 3236918 |
| BAYER CROPSCIENCE LIMITED | 145695 |
| BHARAT BIJLEE LTD | 166590.79 |
| CENTURY RAYON ( UNDER MANAGEMENT & | 11850 |
| NATIONAL ORGANIC CHEMICAL IND | 282091 |
| AUTOMOTIVE MFRS.LTD.(LEYLAND DIV) | 382034 |
| AUTOMOTIVE MANUFACTURES PVT LTD. | 1748453 |
| SECURITY & PERSONNEL SERVICES P LTD | 60986 |
| HEXAWARE TECHNOLOGIES LIMITED | 1895714 |
| SUKHI FACILITY SERVICES PVT LTD | 4263 |
| CONVERGYS INDIA SERVICES PVT LTD | 453476 |
| EUREKA OUTSOURCING SOLUTIONS PVT.LTD | 91310.97 |
| V2 SOLUTIONS V2 TECH VENTURES P LTD | 184317 |
| OCS GROUP ( INDIA ) PVT LTD | 101836 |
| FINO PAYTECH LTD | 10807 |
| AURIONPRO SOLUTIONS LTD | 120307 |
| JUPITER LIFELINE HOSPITALS LTD | 300706 |
| BAYER SCIENCE AND INNOVATION PVT LTD | 85445 |
| DXC TECHNOLOGIES INDIA PVT LTD. | 92308 |
| WAMAN HARI PETHE SONS PVT. LTD. | 14818 |
| CALIBEHR BUSINESS SUPPORT SERVICES PVT LTD | 80456 |
| WAMAN HARI PETHE SONS PVT LTD | 1954 |
| CMA CGM GLOBAL BUSINESS SERVICES (I) PVT LTD | 172775 |
| GEBBS HEALTHCARE SOLUTION PVT LTD | 323319 |
| NAAPTOL ONLINE SHOPPING PVT LTD | 99537 |
| SUKHI ORION SECURITY SYSTEMS PVT LTD | 11873 |
| UNICHEM SERVICES | 38469 |
| TREJHARA SOLUTIONS LTD | 227507 |
| JACOBS SOLUTIONS INDIA PVT LTD | 348587 |
| **RAIGAD(MH)** | |
| EXIDE INDUSTRIES LTD. | 137659.50 |
| WAMAN HARI PETHE SONS PVT LTD | 5213.00 |
| **PALGHAR** | |
| M S R T CORPN PALGHAR DIV | 15478.00 |
| D`DECOR HOME FABRICS PVT.LTD. | 32239.00 |

स्वाक्षरीत/-
कल्याण आयुक्त
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२३** पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये **दिनांक १.०४.२०२३ ते ३१.०३.२०२६** या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

# अशोक ल. लोखंडे विद्यालयात माजी विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**


सर्व माजी विद्यार्थी एकवटून शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू मिळाव्यात यासाठी स्वतःच्या कमाईतून खर्च करून पिटसई येथील अशोक ल.लोखंडे विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावी मधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसाठी आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे .या माजी विद्यार्थ्यांकडून सर्व शालेय विद्यार्थ्यांना वह्या, कंपास पेटी ,पेन चे पॉकेट, शिसपेन्सिल पॉकेट व अन्य शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

नुकतीच शाळा सुरू झाल्यानंतर आवश्यक असणाऱ्या शालेय वस्तू मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यावेळी हसू फुलले. सर्व शालेय विद्यार्थी यांनी माजी विद्यार्थ्यांचे ऋण व्यक्त



केले आहेत. शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे या शाळेचे चेअरमन गणपत जगताप, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड, लक्ष्मण मनवल गुरुजी, सचिव गोविंद ठाकर गुरुजी, जेष्ठ संचालक कृष्णा पंदेरे गुरुजी व विद्यालयाचे मुख्याध्यापक अकिल मुलाणी यांनी केले. उपस्थित शिक्षक वृंद व संस्थेचे पदाधिकारी यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमास माजी विद्यार्थी सुदेश काते, भरत नाडकर, लक्ष्मण बैकर, केतन भात्रे, प्रकाश कातुर्डे, सुरेश नाडकर, तन्वीर पल्लवकर, विजय हिलम, नूतन घोंगे, सुषमा भात्रे हे विद्यार्थी उपस्थित होते. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सुखदेव सवईसर्जे, संजय ठमके, एकनाथ कोळी, सुनील तेलंगे, सुप्रिया रेडीज ,रेखा रेडीज, नीलम गोळे, वरिष्ठ लिपिक दीपक भोसले, बबन जगताप, कोंडीराम हिरवे, रमण महाडिक हे कर्मचारी उपस्थित होते. माजी विद्यार्थी सुदेश काते यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकला पाहिजे यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत वस्तू मोफत मिळाल्या तर त्याची शिकण्याची आस्था वाढेल. यासाठी आम्ही सर्व माजी विद्यार्थी एकत्र येऊन हा उपक्रम राबवल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



**मुरुड : सध्या पावसाने विश्रांती घेतल्याने सायंकाळच्या सुमारास आकाशात विविध रंग काळ्या निळ्या ढगात तयार होताना दिसत आहेत. सायंकाळचा सूर्यास्त होताना मुरुड समुद्रकिनारी टिपलेले हे मनमोहक दृश्य.** (छाया : ईशान बागडे)

# प्रशीक संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**खोपोली :** प्रशीक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था (रजि.)महारष्ट्र राज्य हि संस्था शासकीय ,निमशासकीय,मंत्रालयीन बँकिंग तसेच खाजगी क्षेत्रातील निवृत्त अधिकारी कर्मचारी यांनी एकत्रित येऊन संस्था स्थापन केली आहे. संस्था गेल्या चार वर्षापासून विविध समोजोपयोगी उपक्रम राबवित असून त्यामध्ये पूरग्रस्ताना संसारपयोगी वस्तूचे वाटप,आरोग्य शिबीर विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदत आशा स्वरूपाचे उपक्रम राबवित आहे. संस्थेने शालांत शालांत परीक्षेमध्ये इयत्ता १० वी १२ वी मध्ये ८०% च्या वर गुण प्राप्त करणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती bpl धारक कुटुंबातील आशा विद्यार्थ्यांना गेल्या तीन वर्षांमध्ये ५ लाख २० हजार रुपयाची आर्थिक मदत केली आहे.

संस्थेने मिशन २०२७ संकल्प केला आहे,की K.G.TO PG निवासी शाळा स्थापन करून समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मांस आहे त्यासाठी संस्थेचे अध्यक्ष यशवंत गायकवाड( निवृत्त उपजिल्हाधिकारी)आणि संस्थेचे पदाधिकरी व संस्थेचे एकूण १४२ सदस्य प्रयत्नशील आहेत.

संस्थेने २० विद्यार्थ्यांची निवड करून प्रत्येकी रक्कम रुपये १०हजार रुपयांचे धनादेश वाटप कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष यशवंत गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली शनिवारी "चंद्रमणी बुध्द विहार तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक उल्हासनगर ४ येथे आयोजित केला होता. कार्यक्रमास मिलिंद डोंगरे निवृत्त न्यायमूर्ती तसेच कैलास पगारे निवृत्त आयएएस अधिकारी, एस. एस. ससाणे निवृत्त अप्पर जिल्हाधिकारी प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना धनादेश वितरण कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



# साडेबारा टक्के योजनेअंतर्गत प्रलंबित भूखंड वाटपाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेअंतर्गत प्रलंबित भूखंड वाटपाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. राज्य सरकारने ३६ वर्षांपूर्वी घोषित केलेल्या आणि ३२ वर्षांपूर्वी अमलात आणलेल्या या योजनेसाठी सिडकोने ६ जुलै ते २२ ऑगस्टदरम्यान शिबिरांचे आयोजन केले असून तत्पूर्वी प्रकल्पग्रस्तांना आवश्यक कागदपत्रांसह सिडको भवनात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.




शासनाच्या २२ मे च्या निर्देशानुसार प्रलंबित भूखंड वाटप पूर्ण करण्यासाठी जुलै आणि ऑगस्ट महिन्यात विविध नोडनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर योजनेची उर्वरित प्रक्रिया पूर्ण करण्याचा सिडकोचा प्रयत्न आहे. सिडकोने गुरुवारी प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेनुसार द्रोणागिरी, जेएनपीए, कामोठे–आसूडगाव, करंजाडे–कालुंद्रे, तळोजा–खारघर–नावडे, कळंबोली–रोडपाली आणि ठाणे या सात नोडसाठी ६ जुलै ते २२ ऑगस्टदरम्यान टप्प्याटप्प्याने शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. लाभार्थी भूधारकांनी सोमवार ते शुक्रवार दुपारी २ ते ५ या वेळेत सीबीडी बेलापूर येथील सिडको भवनातील भूमी १२.५ टक्के विभागात आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरांसाठी निवाडा, कब्जेपावती, ७/१२ उतारा, रहिवासी दाखला, आधार, पॅन, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड तसेच वारस, मृत्यू दाखला, हमीपत्र, बंधपत्र आणि प्रतिज्ञापत्र आदी कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. संबंधित कागदपत्रांची साक्षांकित किंवा नोटराईज्ड प्रत सादर करण्याच्या सूचनाही सिडकोने दिल्या आहेत.

पनवेल, उरण आणि नवी मुंबई परिसरातील ९५ गावांतील भूधारकांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणारी साडेबारा टक्के योजना अंतिम टप्प्यात असून, एकूण ९०४.४२ हेक्टरपैकी ८८७.६० हेक्टर क्षेत्राचे, म्हणजेच ९८.१४ टक्के भूखंड वाटप पूर्ण झाले आहे. उर्वरित १.८६ टक्के क्षेत्राच्या वाटपासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू आहे. सध्या ही योजना अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. शेतक–यांच्या जमिनीचे संपादन करून त्या जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के योजनेत विकसित भूखंड देणारी ही योजना होती. ही योजना लागू करण्यासाठी दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या आंदोलनात अनेकांचे प्राण गेले.

गेल्या दोन वर्षांत माजी व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल व सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्या कारकीर्दीत चार संगणकीय सोडतीद्वारे १६ नोडमधील ७३३ भूधारकांना ४ लाख ७५ हजार ५०७ चौरस मीटर क्षेत्राचे भूखंड वाटप करण्यात आले आहे. सिडकोने दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रकरणे संचालक मंडळाच्या मान्यतेने निकाली काढण्याचे प्रयत्न सुरू आहे. सिडकोच्या कारभाराची सूत्रे हाती घेतलेल्या व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल यांच्या नेतृत्वाखाली उर्वरित सर्व पात्र लाभार्थ्यांना साडेबारा टक्के योजनेचा लाभ लवकर मिळण्यासाठी सिडको प्रयत्नशील असल्याचे सांगितले जात आहे.

**भूखंड वाटपाची आकडेवारी**
९०४.४२ हेक्टर एकूण भूखंड
९८.१४ टक्के भूखंड वाटप पूर्ण
१.८६ टक्के भूखंड वाटपासाठी प्रक्रिया सुरू

# 'मन की बात' जनतेशी थेट संवाद

## विकसित भारताचा दृढ संकल्प!

**उरण : रामप्रहर वृत्त**



देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या 'मन की बात' या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या १३५व्या भागाचे उरणचे आमदार महेश बालदी यांनी कार्यकर्त्यां समवेत श्रवण केले. या संवादातून मोदीजी यांनी जनसहभाग, आत्मनिर्भर भारत, राष्ट्रीय सुरक्षा, पर्यावरण संवर्धन आणि राष्ट्रविकासात प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले

यानंतर बोलतांना आमदार महेश बालदी यांनी 'मन की बात' हा केवळ एक कार्यक्रम नसून, समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारा आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारा लोकसंवाद आहे. मोदीजींच्या प्रेरणादायी विचारांतून समाजहितासाठी अधिक समर्पितपणे कार्य करण्याची नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते.

"सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास" या मंत्राला बळ देत विकसित भारताच्या निर्मितीसाठी आपण सर्वांनी आपले योगदान देऊ या असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले.

# आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ नशामुक्ती दिनाच्या अनुषंगाने जनजागृती कार्यक्रम



**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील उरण एज्यूकेशन सोसायटी विद्यालयात विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त नशामुक्ती संदर्भात जनजागृती करण्यासाठी काल २७ जून रोजी १२ : ३० वाजताएका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त किशोर गायके यांच्या मार्गदर्शनाखाली एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नशामुक्तीच्या अनुषंगाने उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनींना अंमली पदार्थामुळे होणारे दुष्परिणाम, सायबर गुन्हे, महिला विषयक गुन्हे, गुड अच बॅड टच या या विषयावर मार्गदर्शन करून नशा मुक्ती संदर्भात शपथ देण्यात आली.उरणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हनिफ मुलाणी, पो.नि.राहुल काटवाणी अंमली पदार्थ विरोधी नवीमुंबईचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप निगळे, दर्शन नाईक यांच्यासह शाळा समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक आणि ४५० हुन अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनी या अंमली पदार्थ विरोधी नशामुक्ती जनजागृती कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# 'लघु उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जनता दरबार घेणार'

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील उद्योग वाढीसाठी तसेच लघुउद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात देशातील उद्योजकांसाठीचा पहिला "जनता दरबारा" चालू करणार असल्याची घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी वाशी येथे केली. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) यांच्या वतीने जागतिक लघु उद्योजक दिनाचे औचित्य साधून वाशी येथे 'महाराष्ट्र 'एमएसएमइ' शिखर परिषद व 'एमएसएमइ' पुरस्कार २०२६' या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



उदय सामंत पुढे म्हणाले की 'लघु उद्योजकां'चे स्वतंत्र आयुक्तालय करण्याचा निर्णय घेतला आहे. 'एम.एस.एम.इ.' च्या माध्यमातून उद्योग करणाऱ्या साठी भूमीचे दर २० टक्के अल्प करण्यात येणार आहे. तसेच त्यांना करामध्ये १० टक्के सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यामध्ये उद्योगांसाठीच्या भूसंपादनामध्ये २० टक्के जागा या उद्योगांना राखीव ठेवण्यात येणार आहे. बंद पडलेले किंवा अन्य कारणामुळे थांबलेले उद्योगाची जबाबदारी शासनाने घेणे आवश्यक आहे. परदेशातीही मराठी मोठे उद्योजक आहे. हे उद्योजक महाराष्ट्रात येऊन उद्योग चालू करणार असतील, तर त्यांच्यासाठी देखील इन्सेटीव्ही देण्यात येणार आहे.

राज्यातील उद्योजकाला अडचण येता कामा नये. अडचण आणणाऱ्या अधिकाऱ्याला आमच्या कारवाईला सामोरे जावे लागेल. उद्योजकाच्या पाठीशी सरकार उभे आहे. आपण स्वतः पुढील महिन्यापासून राज्यामधील लघु उद्योजकांच्या जिल्हास्तरावर भेटी घेणार आहे. यामध्ये कोणाला उद्योगासाठी अनुमती किंवा अन्य काही अडचणी असतील, तर तिथल्या तिथे उद्योजकांना न्याय देण्याची भूमिका घेतली जाईल. अशाप्रकारे देशातील पहिला उद्योजकांसाठी जनता दरबार चालू करण्यात येणार आहे.

गडचिरोली जिल्हा आता उद्योग जिल्हा म्हणून उदयास येत आहे. नक्षलग्रस्त भागाचा प्रभाव कमी झाला आहे. महाराष्ट्र उद्योगात देशात पहिल्या क्रमांकावर आलेला आहे. माथाडी कामगार कायदा चांगला आहे. काही माथाडी कामगार नसलेल्या संघटना उद्योजकांना ब्लॅकमेल करत आहे. अशा लोकांना कठोर कारवाई केली जात आहे, असे सामंत यांनी सांगितले. या शिखर परिषदेमध्ये राज्यभरातील २ सहस्र ५०० हून अधिक उद्योजक, धोरणकर्ते, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी सहभागी झाले होते. या वेळी महाराष्ट्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या २२ उद्योगांचा गौरव करण्यात आला.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक येथे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विद्यार्थिनी कु.आज्ञा डुकरे कु. अनुजा फाटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर शिक्षकांमधून मच्छिंद्र बाविस्कर सर यांनी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक, कार्याबद्दल विचार मांडले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र भाई शहा यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याविषयी आपले अनमोल विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी शाळेच्या उपमुख्याध्यापिका योजना म्हात्रे व सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शरद कुंभार सर यांनी केले.



**नवी मुंबई: देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदीयांच्या 'मन की बात' या१३५ व्या भागातून देशवासियांना प्रेरणादायी संदेश मिळाला.समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जनसहभाग, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक सुरक्षा योजनांचे महत्व ही त्यांनी स्पष्ट केले."मन की बात" हा केवळ संवाद नसून, देशाच्या प्रगतीचा, जनशक्तीचा आणि राष्ट्रनिर्माणाचा प्रेरणादायी प्रवास आहे.**

# न्यायालयीन आदेशांची पडताळणी करण्याचे महापालिका आयुक्तांचे निर्देश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

न्यायालयाने कोणताही स्थगिती आदेश दिलेला नसताना तसा आभास निर्माण करणारा बनावट आदेश थेट नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आला होता. सारसोळे येथील हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर महापालिका प्रशासनाने शहरातील न्यायालयीन आदेशांची व्यापक पडताळणी सुरू केली आहे.

महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार सर्व विभागप्रमुखांकडून कारवाई रोखण्यासाठी सादर करण्यात आलेल्या न्यायालयीन आदेशांची माहिती मागविण्यात आली आहे. विशेषतः हस्तलिखित शेरा, अतिरिक्त नोंदी अथवा स्थगितीबाबत उल्लेख असलेल्या आदेशांच्या प्रती, संबंधित फाइल्स आणि कागदपत्रे विधी विभागाकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

सध्याच्या ई–कोर्ट प्रणालीमध्ये बहुतांश आदेश संगणकीकृत स्वरूपात उपलब्ध असतात. त्यामुळे हस्तलिखित नोंदी किंवा नंतर जोडण्यात आलेल्या मजकुराच्या प्रकरणांची स्वतंत्र छाननी केली जाणार आहे. विविध विभागांतील जुनी प्रकरणेही पुन्हा तपासली जात असून, न्यायालयीन आदेशांचा गैरवापर करून कारवाई रोखण्यात आली होती का, याची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. महापालिकेच्या या उपक्रमामुळे शहरातील प्रलंबित अनधिकृत बांधकामांच्या प्रकरणांकडेही नव्याने लक्ष वेधले गेले आहे.

न्यायालयाने कोणताही स्थगिती आदेश दिलेला नसताना दिल्याचा आभास निर्माण करणारा बनावट आदेश थेट नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवून अनधिकृत बांधकामावरील कारवाई रोखण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत बेलापूर येथील चौथे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) विनायक एच. विश्वास यांनी न्यायालयीन आदेशात फेरफार झाल्याचे नमूद केले. न्यायालयीन नोंदींचा गैरवापर करून प्रशासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे निरीक्षण नोंदवत त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक अरुण कृष्णा भिलारे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी बुधवारी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे हा विषय उपस्थित केला. महापालिका आयुक्तांनाच बनावट स्थगिती आदेश पाठवून दिशाभूल केली जात असेल, तर अशाच प्रकारे इतर अनधिकृत बांधकामांनाही संरक्षण मिळाले असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे त्यांनी सभागृहात नमूद केले. हा प्रकार केवळ एका इमारतीपुरता मर्यादित नसून अशाच पद्धतीने इतर अनधिकृत बांधकामांनाही संरक्षण मिळाले असण्याची शक्यता असल्याचा दावा त्यांनी केला. संपूर्ण प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी करून यामागील सूत्रधार आणि संभाव्य भूमाफिया साखळी समोर आणावी, अशी मागणी त्यांनी केली.



**पनवेल : देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'मन की बात' या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या १३५व्या भागाचे देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या 'मन की बात' या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या १३५व्या भागाचे आयोजन पनवेल महापालिकेचे माजी विरोधीपक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी जे. एम. म्हात्रे साहेब यांचे निवासस्थान, कोपर, पनवेल येथे करण्यात आले होते .या प्रसंगी मोठ्या संख्येने उलवे येथिल भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. सर्वांनी अत्यंत उत्साहाने 'मन की बात' कार्यक्रम ऐकत विकसित भारत घडविण्याच्या संकल्पनेला आपला दृढ पाठिंबा व्यक्त केला.**

# दिवाळेत ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस, अभीष्टचिंतन सोहळा उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे कोळीवाडा येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात शनिवार दि. ( २७ ) रोजी पार पडला. संस्थेच्या वतीने दर महिन्याला वाढदिवस असलेल्या सदस्यांचा एकत्रित वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा साजरा करण्यात येतो . यावेळी एकूण ९१ ज्येष्ठ सदस्यांचा पुष्पगुच्छ व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये ६१ पुरुष आणि ३० महिला ज्येष्ठांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरील आनंद, समाधान आणि उत्साह पाहण्यासारखा होता. एकमेकांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत, जुन्या आठवणींना उजाळा देत आणि मनमोकळ्या गप्पांमधून आनंदाचे क्षण अनुभवत सर्वांनी या सोहळ्याचा मनसोक्त आनंद लुटला.

अनेक ज्येष्ठांनी आपल्या भावना व्यक्त करत संस्थेमुळे मिळणारे प्रेम, आपुलकी आणि सहवास हेच आयुष्याला नवी उमेद देणारे असल्याचे सांगितले. हसतमुख वातावरण, टाळ्यांचा कडकडाट आणि परस्परांतील जिव्हाळ्यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला एका कौटुंबिक मेळाव्याचे स्वरूप प्राप्त झाले.

संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे येथे सर्व ज्येष्ठ नागरिक एका मोठ्या कुटुंबाप्रमाणे एकत्र येतात. दररोज सामूहिक हरिपाठ करून आध्यात्मिक आणि सामाजिक ऐक्य जपले जाते. तसेच दरवर्षी धार्मिक सहलीचे आयोजन करून ज्येष्ठांना विरंगुळा, भक्ती आणि परस्पर सहवासाचा आनंद दिला जातो. या उपक्रमांमुळे ज्येष्ठांमध्ये सकारात्मक ऊर्जा, परस्पर प्रेम, जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत आहे.

दरम्यान, हा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा केवळ वाढदिवस साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, ज्येष्ठांच्या जीवनातील आनंदाचे क्षण साजरे करण्याचा आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हृदयस्पर्शी उपक्रम ठरला. उपस्थित सर्वांनी संस्थेच्या या स्तुत्य कार्याचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे ज्येष्ठांच्या आयुष्यात नवचैतन्य निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी यांनी यावेळी सर्व ज्येष्ठांना शुभेच्छा देत, भविष्यातही अशाच उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल असे सांगितले.

# श्रीवर्धनकरांसाठी 'अनाथाचा नाथ' धावला; जलवाहिनी बदलण्यासाठी आठ कोटींचा निधी देण्याचे आश्वासन!

## मंत्री भरत गोगावले यांच्या मध्यस्थीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सकारात्मक संकेत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून पाण्याच्या एका-एका थेंबासाठी तडफडणाऱ्या आणि निकृष्ट दर्जाच्या नळपाणी योजनेचा त्रास सहन करणाऱ्या श्रीवर्धनकरांसाठी अखेर अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. श्रीवर्धन शहराचा पाणी प्रश्न कायमचा मिटवण्यासाठी आणि वेळोवेळी फुटणारी मुख्य जलवाहिनी बदलण्यासाठी तब्बल ८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन वरिष्ठ पातळीवरून देण्यात आले असून, यामुळे



शहरवासीयांना खूप मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

श्रीवर्धन शहराचा पाण्याचा प्रश्न २४ कोटींच्या पाणी योजनेच्या बोजवाऱ्यामुळे आणि सतत फुटणाऱ्या पाईपलाईनमुळे अत्यंत बिकट झाला होता. यामुळे लाखो लीटर शुद्ध पाणी दररोज रस्त्यावर वाहून जात होते आणि नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत श्रीवर्धन येथील नगराध्यक्ष, गटनेते, नगरसेवक आणि शिवसेना शहरप्रमुखांच्या एका प्रमुख शिष्टमंडळाने महाड-पोलादपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार मा. भरतशेठ गोगावले साहेब यांची तातडीने भेट घेतली आणि श्रीवर्धनकरांची व्यथा त्यांच्यासमोर मांडली.

परिस्थितीचे गांभीर्य आणि नागरिकांचे हाल लक्षात घेऊन मंत्री गोगावले यांनी क्षणाचाही विलंब न लावता थेट उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी श्रीवर्धनच्या पाणी समस्येची तीव्रता मुख्यमंत्र्यांच्या कानावर घातली. त्यावर उपमुख्यमंत्र्यांनी तातडीने सकारात्मक प्रतिसाद देत, मुख्य जलवाहिनी संपूर्णपणे बदलण्यासाठी ८ कोटी रुपये तात्काळ उपलब्ध करून देणार असल्याचे खात्रीदायक आश्वासन दिले असल्याची माहिती श्रीवर्धन नगरपालिकेचे गटनेते देवेंद्र भुसाणे यांनी वृत्तपत्रांशी बोलताना दिली.

"श्रीवर्धनची जनता पाण्यासाठी अत्यंत हालअपेष्टा सहन करत होती. निकृष्ट कामामुळे मुख्य पाईपलाईन सतत फुटत असल्याने शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत होत होता. मात्र, आमच्या शिष्टमंडळाने भरतशेठ गोगावले साहेबांची भेट घेताच, त्यांनी श्रीवर्धनकरांच्या सुटकेसाठी थेट ८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून देण्याचे आश्वासन आणले आहे. तहानलेल्या श्रीवर्धनकरांसाठी हा खूप मोठा दिलासा असून खऱ्या अर्थाने जनतेसाठी 'अनाथाचा नाथ' धावून आला आहे."

> *या ८ कोटींच्या निधीचे आश्वासन मिळाल्यामुळे अबालवृद्धांचे हाल थांबणार असून, श्रीवर्धनमधील गळक्या, जीर्ण आणि फुटक्या पाईपलाईनचा प्रश्न कायमचा निकाली निघण्याची आशा निर्माण झाली आहे. प्रशासकीय पातळीवर या निधीच्या मंजुरीची प्रक्रिया लवकरच पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, असा विश्वास स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यक्त केला आहे.*
>
> ***-देवेंद्र भुसाणे, गटनेते श्रीवर्धन नगरपालिका***

## रोहा येथील मेहेंदळे विद्यालयात 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नागोठणे :** रोहा येथीलकोकण एज्युकेशन सोसायटीचे मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात शनिवार (दि.२७ जून)रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. भारत सरकारचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुरू केलेल्या ''एक पेड माँ के नाम'' या अत्यंत सुंदर आणि प्रभावी मोहिमेअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. भू मातेच्या प्रेमाचा आणि त्यागाचा सन्मान करणे तसेच पर्यावरणाचे रक्षण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी विद्यालयातील ''६ महाराष्ट्र बटालियन मुंबई A'' या एनसीसी ट्रूपच्या वतीने एनसीसी कमांडर संदीप चांदोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शालेय परिसरात विविध प्रकारच्या फळझाडांची आणि फुलझाडांची लागवड करण्यात आली. प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक रोप लावून त्याचे उत्तम प्रकारे संगोपन करावे, ही या संकल्पनेमागील साधी पण प्रभावी पद्धत आहे. या वृक्षारोपणामुळे परिसरात हरित पट्टा वाढण्यास मदत होईल, हवा शुद्ध होईल आणि भावी पिढीसाठी एक निरोगी वसुंधरा तयार होईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

# रसायनी परिसरासाठी आरोग्य सेवेत ऐतिहासिक पाऊल ; अद्ययावत रक्त साठवणूक केंद्राचे उद्घाटन

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रसायनी व पाताळगंगा औद्योगिक परिसरातील नागरिकांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक जाणिवेतून साकारलेल्या 'रसायनी ब्लड स्टोरेज सेंटर' या अत्याधुनिक रक्त साठवणूक केंद्राचे उद्घाटन शनिवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात पार पडले.खालापूर तालुक्यातील रीस येथील निरामय हॉस्पिटलमध्ये सुरू झालेल्या या केंद्रामुळे परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, या सामाजिक उपक्रमाचे शिल्पकार प्रतीक्षा कुरंगळे,सचिन पाटील तसेच निरामय हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. संजय कुरंगळे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



पनवेलचे प्रसिद्ध व नामवंत तज्ज्ञ डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते या रक्त साठवणूक केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.या सोहळ्यास वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच उमाताई मुंढे, माजी सरपंच संदीप मुंढे,डॉ.प्रतिभा महेंद्रीकर,जिल्हा परिषद सदस्या अनन्या गाताडे,खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे,वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत यादव,साई रक्तपेढीचे संचालक किशोर बडगुजर, प्रायमा असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ.अमित सावंत,प्रतीक्षा कुरंगळे यांचे वडील जगदीश गणेश पाटील,रोटरी क्लब पाताळगंगाचे अध्यक्ष विजय पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात बोलताना प्रतीक्षा कुरंगळे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आजचा दिवस माझ्या आयुष्यातील स्वप्नपूर्तीचा क्षण आहे. गेली अनेक वर्षे रक्तपेढी क्षेत्रात काम करताना रसायनी परिसरात सर्वसामान्यांसाठी रक्त साठवणूक केंद्र असावे,ही मनोमन इच्छा होती.डॉ. संजय कुरंगळे यांनी माझ्या या सामाजिक संकल्पाला साथ दिली आणि त्यामुळे आज हे स्वप्न साकार झाले.

सरपंच उमाताई मुंढे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, तब्बल अकरा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हा सुवर्णयोग जुळून आला आहे.समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत प्रतीक्षा कुरंगळे यांनी परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिली असून, हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

उद्घाटक डॉ.गिरीश गुणे म्हणाले, "रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही.ते फक्त रक्तदात्यांकडूनच मिळते. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी रक्तदान करावे.वेगाने विकसित होत असलेल्या औद्योगिक परिसरात हे रक्त साठवणूक केंद्र सुरू होणे ही अत्यंत आनंदाची बाब असून, आपत्कालीन परिस्थितीत अनेक रुग्णांचे प्राण वाचविण्यास मोलाची ठरेल.

# शहरात हेल्मेटची सक्ती; शहराबाहेर शेकडो दुचाकी विनाहेल्मेट

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरात पोलिसांनी हेल्मेट सक्ती केली असून बाजारपेठ, एसटी स्टॅन्ड परिसरात दंड केले जात आहे, गावामध्ये हि सक्ती केली जात असताना शहराबाहेर शेकडो दुचाकी विनाहेल्मेट प्रवास करताना दिसून येत आहेत, तिथे कोणतीही कारवाई होतं नसून नागरि वसतीमधील दुचाकिंना सॉफ्ट टार्गेट केले जात असल्याने रोहेकर संतापले आहेत. पोलिसांप्रति नाराजी व्यक्त करताना "धूम स्टाईल, ट्रिपलसीट दुचाकिंवर आधी कारवाई करा, शहरातील अवैध धंदे सर्वप्रथम बंद करा," अशी मागणी रोह्यात जोर धरत आहे.



हेल्मेट नक्की सुरक्षित साधन आहे, यात वाद नाही. परंतू आता रोहा शहरात हेल्मेट न घातल्यास दंड वसुलीला सुरुवात झाल्याने शहरामध्ये हि कारवाई उचित नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रोहा हा मुंबई, पुणेसारखा शहर नाही, छोटे शहर आहे, त्यामुळे स्थानिकांनी शहरात सारखे ये, जा करावी लागते, करताना हेल्मेट घालावे अशी सक्ती करणे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे नागरि वसतीमध्ये अशी कारवाई करू नयेत. रोहा पोलिसांनी वाहन चालविताना शिस्त, धूम स्टाईल रोखली तर वाहतूक, रहदारी अधिक सुरक्षित होईल, रोहा बाहेर जाणाऱ्यांना हेल्मेट घालणे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य आहे, पण शहरातील स्थिर वस्तीत हेल्मेट सक्तीला नागरिकांनी विरोध केला असून तीव्र नाराजी व्यक्त होतं आहे. टू व्हिलरवर अनेकजण ट्रिपल सीट जातात, सुसाट जातात, त्यात शालेय, विद्यालयीन तरुण जास्त दिसतात, अनेकदा नवीन गाड्या त्यावर ट्रीपल सीट सुसाट जाणाऱ्या मुख्यतः आदिवासी मुलांचे अपघात झाल्याचे समोर आले आहे, काहींनी अशा अपघातात जीव गमावला लागला आहे, काही जायबंद आहेत, पोलिसांनी अशांवर कारवाईचा बडगा दाखविणे गरजेचे असताना सामान्यांना नागरिकांना नागरिक वस्तीत टार्गेट केले जात आहे.

> **शहरात अगदी किरकोळ अंतरासाठीही दुचाकीचा वापर अपरिहार्य झाला आहे. दूध, भाजीपाला आणणे किंवा मंदिरात जाण्यासारख्या दैनंदिन कामांसाठीही नागरिक दुचाकी वापरतात. त्यामुळे सर्वांवर सरसकट हेल्मेट सक्ती आणि दंडाची अंमलबजावणी करताना व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. हेल्मेट नियमात तसेच दंडाच्या तरतुदींमध्ये वास्तव परिस्थितीचा विचार करून आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात.**
>
> **-संदीप सरफळे, सरचिटणीस, रोहा सिटीझन फोरम**

# कोकण विभागातील नागरी पतसंस्थांच्या संचालक व कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मा. जिल्हा उपनिबंधक, रायगड-अलिबाग, कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ, अलिबाग आणि कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने संचालक व कर्मचारी वर्गासाठी आयोजित दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरास चौल येथील वसुंधरा हॉटेल येथे उत्साहात प्रारंभ झाला.

या प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन समारंभास मा. श्री. संतोष घेराडे, सचिव, कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ, अलिबाग यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. गिरीश तुळपुळे, अध्यक्ष, कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ, अलिबाग हे होते. तर श्री. नंदकुमार चाळके, अध्यक्ष, कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

दि. २७ व २८ जून २०२६ रोजी आयोजित या प्रशिक्षण शिबिरात कोकण विभागातील विविध नागरी सहकारी पतसंस्थांचे संचालक, व्यवस्थापक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.प्रशिक्षण शिबिरात सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांकडून सहकार कायदे, पतसंस्थांचे सुशासन, रिझर्व्ह बँकेचे नियम, आर्थिक शिस्त, लेखापरीक्षण, जोखीम व्यवस्थापन, ग्राहक सेवा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर तसेच बदलत्या आर्थिक परिस्थितीत नागरी पतसंस्थांची भूमिका या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे.या प्रशिक्षणामुळे संचालक व कर्मचाऱ्यांचे ज्ञान अद्ययावत होऊन पतसंस्थांचे प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक व कार्यक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.




## अंजुमन कॉलेज येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक न्याय दिन साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा येथे ग्रंथालय समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'सामाजिक न्याय दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने "समावेशक समाज निर्मितीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान" या विषयावर ऑनलाइन अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. अशा प्रकारचे कार्यक्रम सामाजिक न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोजित केले जातात.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख होते. त्यांनी विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी जे.एस.एम. कॉलेज, अलीबाग येथील वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख डॉ. प्रेम बी. आचार्य हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण, सामाजिक समता, आरक्षण, स्त्रीशिक्षण आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. सामाजिक न्यायाची संकल्पना आजच्या काळात अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने ऑनलाइन उपस्थिती दर्शविली.

या कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय समितीच्या वतीने करण्यात आले.

# सागरी मच्छीमारी बंद; पोटासाठी मुरुडचा मच्छीमार जातोय मोलमजुरीला

## किनारी रापण करून पोट भरत आहेत कोळी बांधव

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

हवामानखात्याकडून दरवर्षी खोलसमुद्रातील मासेमारी ३१ मे पासून बंद करण्याचे आदेश देते .परंतु ह्यावर्षी खराब हवामान असलयाने व मासळीचा दुष्काळ असल्याने मच्छिमार आपली बोट मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ४०० यांत्रिक बोटी किनाऱ्यावर ओढली .पुढील ३ महिने मासेमारी बंद असल्याने कोळी बांधव हैराण आहे .बोटीवरील कर्जाचे हप्ते फेडता येत नाही ,मासळीचा दुष्काळ असल्याने घरात पैशाची चणचण पुढील २ महिने खायचे काय हा प्रश्न ? सद्य युवावर्ग समुद्रकिनारी रापण करून मासे पकडतात .त्यातही समुद्रात ऑइल आल्याने ती मासळीदेखील पाळली .शेवटचा पर्याय म्हणून सकाळी उठून मोलमजुरीवर जाण पसंत केले आहे



मुरुड व एकदरा येथील मच्छिमार अजूनही पारंपरिक पद्धती वापरून मासेमारी करतो .अद्यावत जाळी ,अद्यावत बोटी ,विकसित मासळी शोधक यंत्र याचा वापर मुरुड मच्छिमार करत नाही .कारण मिळालेली मासळी विकण्यासाठी मुरुड शहरात कोणतीही बाजारपेठ नाही अथवा मासळी साठवण्यासाठी कोल स्टोअरेज नाही गेली ५० वर्ष झाली मासेमारीसाठी आरक्षित बंदर नाही कि त्याठिकाणी एकत्र सर्व सुविधा उपलब्ध असतील .आजही मुरुडच्या बोटी किनाऱ्यावर वाळूत लावाव्या लागत आहेत , साधी बोटीलावण्यासाठी जेटी नाही .पूर्वी म्हणजे २५ वर्ष आधी मुरुड बाजारपेठेत आर्थिक उलाढाल हि कोळी समाजावर होत असत पण आज कोळी समाज आर्थिक कोंडीत सापडला आहे कोणत्याही लोकप्रतिनिधीला का वाटत नाही कि यांच्यासाठी काहीतरी करणे गरजेचे आहे

मुरुड व एकदरा खाडीत फिशरीष खात्याने ७ कोटी खर्च करून खाडीतील गाळ काढला होता व एकदरा येथे मासळी सुकवण्यासाठी जेटी बनवण्यात आली होती. स्थानिक कोळीबांधवना विचारात न घेता बांधण्यात आलेल्या जेटीला बोटी लागत नाही ,तिचा वापर मासळी सुकवण्यासाठीच होतो ,खाडीतील काढलेला गाळ २ वर्षात पुन्हा पूर्वीपेक्षा जास्त झाला आहे .ओहोटीला कोळी बांधवांच्या बोटी अडकतात व बोटींचे नुकसान होते. आता कोळी बांधवनसाठी ग्रॉइन बंधाऱ्याचे काम सुरु झाले आहे .त्याचा किती फायदा होणार ते येत्या काळात समजेल

राज्य शासनाने एलईडी द्वारे मासेमारी करणाऱ्यांचे व्ही . आर .सी व नौका जप्ती करण्याची कायदयात सुधारणा करून मागील चार ते पाच वर्षांचा थकीत डिझेल परतावा त्वरीत अदा करण्याची मागणी कोळी बांधव करत आहेत केंद्र शासनाचा समुद्र विकण्याचा डाव असुन खासगीकरणातुन अदानी सारखे भांडवलदार मोठे करायचे आहेत . समुद्र आमची आई असुन मच्छीमारां पासुन ती ओरबाडण्याची कृती सुरु असल्याची भीती कोळी बांधव व्यक्त करत आहेत . चिन देशाशी स्पर्धा करतांना पर्यावरणाचा समतोल ढळतो आहे .समुद्रात बंदरे, मोठ मोठे प्रकल्प आणुन समुद्रातील जैव विवधतेला धोका येते यावर सरकारने मच्छिमारांच्या हिताचे निर्णय घेणे गरजेचे आहे

सद्य पावसाळी पर्यटक सुरु झाल्याने पावसाळ्यात खडकातील चोंबोरी ,बॉबील ,छोटी मासळी बाजारात येते त्यासाठी छोट्या बोटी अगरदांडा खाडीत व राजपुरी खाडीत पोटापुरती मासळी पकडून पर्यटकांना खुश करत आहेत .अति पाऊस व वादळ असल्यास ते देखील मिळत नाही म्हणूनच कोळी बांधव पर्याय शोधू लागला आहे.

# अर्जेंटिनाची विजयी घोडदौड कायम

## मेस्सीचा नवा विक्रम

**अर्लिंग्टन, टेक्सास : वृत्तसंस्था**

गतविजेत्या अर्जेंटिनाने जॉर्डनचा ३-१ असा पराभव करत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील गट फेरीचे तिन्ही सामने जिंकून निर्भेळ यश संपादन केले आहे. या विजयासह अर्जेंटिनाने बाद फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.



या सामन्यात बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या लिओनेल मेस्सीने ८० व्या मिनिटाला गोल करत विश्वचषकातील आपल्या एकूण गोलांची संख्या १९ वर नेऊन ठेवली. यासोबतच. सलग सात विश्वचषक सामन्यांमध्ये गोल करण्याचा विक्रम करत त्याने फ्रान्सच्या जस्ट फॉन्टेन आणि ब्राझीलचे जॅरझिन्हो यांच्या विक्रमाची बरोबरी मोडली आहे. मेस्सीने या विश्वचषकात आतापर्यंत शानदार कामगिरी करत अर्जेंटिनासाठी एकूण पाच गोल केले आहेत.

१९ व्या मिनिटाला जिओवानी लो सेल्सोने थेट फ्री किकवर गोल करत अर्जेंटिनाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मेस्सी व्यतिरिक्त या विश्वचषकात गोल करणारा तो अर्जेंटिनाचा पहिला खेळाडू ठरला आहे. ३१ व्या मिनिटाला लॉटारो मार्टिनेझने पेनल्टी किकद्वारे अर्जेंटिनासाठी दुसरा गोल केला. जॉर्डनच्या मौसा अल्तामारीने ५५ व्या मिनिटाला गोल करत सामन्यात थोडी चुरस निर्माण करण्याचा प्रयत्न केला, मात्र अर्जेंटिनाचा विजय निश्चित होता. अर्जेंटिनाने गट फेरीतील सर्व सामने जिंकण्याची ही पाचवी वेळ आहे. आता ३२ संघांच्या बाद फेरीत अर्जेंटिनाचा सामना केप वर्दे विरुद्ध होणार आहे. हा सामना मियामीमध्ये खेळवला जाईल, जो मेस्सीच्या मेजर लीग सॉकर (MLS) संघाचे घरचे मैदान आहे. विशेष म्हणजे केप वर्दे हा बाद फेरीत पोहचलेला आतापर्यंतचा सर्वात लहान देश आहे. या सामन्यात अर्जेंटिनाचे नवे खेळाडू निकोलस पाझ, ज्युलियानो सिमिओने, मार्कोस सेनेसी आणि लो सेल्सो यांनीही आपल्या कामगिरीने प्रभावित केले. पाझ आणि सिमिओने हे अर्जेंटिनाच्या माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूंचे पुत्र असून विश्वचषकाच्या मंचावर पितापुत्रांची ही परंपरा पुढे नेणारे पहिले खेळाडू ठरले आहेत.

# इंग्लंडने पनामाला २-०ने हरवले

## केन-बेलिंगहॅम जोडीची कमाल

**न्यू जर्सी : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये इंग्लंडने पनामा संघावर २-० असा शानदार विजय मिळवत गट 'L' मध्ये अव्वल स्थान पटकावले. न्यू जर्सी येथे झालेल्या या सामन्यात दुसऱ्या सत्रातील आक्रमक खेळाच्या जोरावर इंग्लंडने सामन्यावर पकड मिळवली. हॅरी केनने केलेल्या ऐतिहासिक गोलमुळे त्याने विश्वचषकाच्या इतिहासात इंग्लंडचा सर्वाधिक गोल करणारा खेळाडू बनण्याचा मान मिळवला.

न्यू जर्सी येथे झालेल्या या सामन्यात पहिल्या सत्रात दोन्ही संघांना गोल करता आला नाही. दुसऱ्या सत्रात इंग्लंडने आक्रमक खेळ करत सामन्यावर पकड मिळवली. ६२व्या मिनिटाला ज्युड बेलिंगहॅम याने कॉर्नर वरून आलेल्या चेंडूवर अप्रतिम फिनिश करत इंग्लंडला १-० अशी आघाडी मिळवून दिली.



यानंतर अवघ्या सहा मिनिटांनी, म्हणजेच ६८व्या मिनिटाला बेलिंगहॅमच्याच अचूक क्रॉसवर हॅरी केन याने शानदार हेडर करत दुसरा गोल झळकावला. या गोलसह केनने फिफा विश्वचषकात एकूण ११ गोल पूर्ण केले आणि विश्वचषकांच्या इतिहासात इंग्लंडचा सर्वाधिक गोल करणारा खेळाडू बनण्याचा ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केला.

या विजयासह इंग्लंडने गट 'L' मध्ये अव्वल स्थान निश्चित केले. बाद फेरीतील मोहिमेसाठी दमदार दावेदारी सिद्ध केली. पनामाला इंग्लंडच्या भक्कम बचावफळीसमोर गोल करण्याची संधी मिळाली नाही. हॅरी केनचा ऐतिहासिक विक्रम व ज्युड बेलिंगहॅमची उत्कृष्ट कामगिरीमुळे इंग्लंडचा हा विजय विश्वचषक २०२६ मधील महत्त्वाच्या सामन्यांपैकी एक ठरला.

# पोर्तुगाल-कोलंबिया सामना बरोबरीत : गटात कोलंबिया अव्वल

**मियामी : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेतील गट 'K' मधील महत्त्वाच्या सामन्यात पोर्तुगाल आणि कोलंबिया यांच्यात ०-० असा गोलशून्य सामना झाला. या निकालामुळे पोर्तुगालला गटात अव्वल स्थान मिळवण्याची मोठी संधी गमवावी लागली, तर कोलंबियाने गट 'K' मध्ये अव्वल स्थान कायम राखले.

संपूर्ण सामन्यात कोलंबियाने आक्रमक खेळ करत पोर्तुगालवर दबाव कायम ठेवला. विशेषतः कोलंबियन चाहत्यांच्या मोठ्या उपस्थितीमुळे स्टेडियममधील वातावरण त्यांच्या बाजूने होते.



अतिरिक्त वेळेत डॅव्हिन्सन सांचेझने गोल केला होता. मात्र, व्हीएआर व्हिडिओ असिस्टंट रेफरी तपासणीनंतर तो गोल रद्द करण्यात आला.पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो या सामन्यात संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला. तर ब्रुनो फर्नांडिस याने मिळालेली सुवर्णसंधी दवडल्याने पोर्तुगालला गोल करता आला नाही. निकालानंतर पोर्तुगालचा राऊंड ऑफ १६मध्ये क्रोएशिया विरुद्ध सामना होणार आहे. कोलंबिया पुढील फेरीत घानाशी स्पर्धा करणार आहे.

# सीकेटीच्या वेदांत नाईकची राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी कॉलेजच्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर रोलर स्केटिंगमध्ये उल्लेखनीय यश मिळवत पनवेल, रायगड जिल्हा आणि महाराष्ट्राची मान उंचावली आहे. टीवायबीएस्सी अंतिम वर्षात शिकणाऱ्या वेदांत सागर नाईकने रांची येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत एक रौप्य आणि एक कांस्यपदक पटकावले आहे.

रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या (RSFI) वतीने १७ ते २१ जूनदरम्यान रांची येथे राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत देशभरातील अव्वल खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कडव्या स्पर्धेत वेदांतने दमदार कामगिरी करीत दोन पदकांची कमाई केली. अभ्यासासोबत क्रीडा क्षेत्रातही सातत्याने मेहनत घेणाऱ्या वेदांतने आपल्या जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्याच्या या कामगिरीमुळे सीकेटी कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# पनवेलच्या रोनक जितेकरचा हैदराबादमध्ये डंका

## १६व्या वर्षी दोन राष्ट्रीय विक्रमांसह सुवर्णपदक

**पनवेल/हैदराबाद : वृत्तसंस्था**

पनवेल तालुक्यातील दापोली गावच्या १६ वर्षीय रोनक रोशन जितेकरने राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत इतिहास रचला आहे. हैदराबादच्या गचीबोवली स्टेडियमवर पार पडलेल्या नॅशनल सब ज्युनिअर पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२६ मध्ये रोनकने १०५ किलो वजन गटात दोन नवीन राष्ट्रीय विक्रमांसह सुवर्णपदक पटकावले आहे.

२७ जून रोजी झालेल्या अटीतटीच्या स्पर्धेत रोनकने २८८.५ किलो वजन उचलून सर्वांना थक्क केले. या कामगिरीसह त्याने सबज्युनिअर गटात दोन राष्ट्रीय विक्रम स्वतःच्या नावे केले. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच वर्चस्व राखत रोनकने देशात अव्वल स्थान मिळवले. या ऐतिहासिक कामगिरीमुळे रोनकची आगामी आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी थेट निवड झाली आहे. वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण करणारा तो रायगड जिल्ह्यातील पहिलाच खेळाडू ठरला आहे.



रोनकचे यश क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्याच्या यशाने पनवेल तालुका आणि रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. रोनकच्या अभूतपूर्व यशाबद्दल दापोली ग्रामस्थ मंडळ, प्रशिक्षक, पनवेल पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आणि समस्त गावकऱ्यांनी त्याचे कौतुक केले आहे.

# खेळाडूंच्या विश्रांतीसाठी बीसीसीआयचा मोठा निर्णय

## श्रीलंकेविरुद्ध टी-२० सामने रद्द

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) श्रीलंका क्रिकेट बोर्डाने पाठवलेला एक प्रस्ताव थेट धुडकावून लावला आहे. एका शेजारील देशाच्या क्रिकेट बोर्डाने टी-२० मालिकेसाठी भारताला दिलेला हा प्रस्ताव बीसीसीआयने नाकारल्याने आता या आगामी दौऱ्यात केवळ कसोटी सामने होणार असून टी-२० क्रिकेटला 'नो एण्ट्री' देण्यात आली आहे.

खरंतर ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाच्या श्रीलंका दौऱ्यात आता केवळ दोन सामन्यांची कसोटी मालिकेपुरती मर्यादित राहणार आहे. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने (एसएलसी) या दौऱ्यात ३ सामन्यांची टी-२० मालिका समाविष्ट करण्याची विनंती केली होती, जी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने फेटाळली आहे. भारताच्या अत्यंत व्यस्त आंतरराष्ट्रीय वेळापत्रकामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते.

दोन्ही देशांमधील ही कसोटी मालिका २१ ऑगस्टपासून सुरू होणार आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला जानेवारी महिन्यात श्रीलंका क्रिकेट बोर्डाने दितवाह चॅरिटी उपक्रमाच्या मदत निधीसाठी आर्थिक साहाय्य उभारण्याच्या उद्देशाने ३ अतिरिक्त टी-२० सामने खेळण्याची विनंती बीसीसीआयकडे केली होती. श्रीलंका आणि भारत यांच्यातील कसोटी मालिका संपल्यानंतर दोन आठवड्यांचा वेळ उपलब्ध होता. या काळात या टी-२० सामन्यांचे आयोजन करता आले असते यावर दोन्ही बोर्डांमध्ये चर्चाही झाली. मात्र, खेळाडूंचे कार्यभार व्यवस्थापन आणि आधीच ठरलेल्या इतर क्रिकेट मालिकांमुळे बीसीसीआयने या प्रस्तावास असमर्थता दर्शवली.

बीसीसीआयने श्रीलंका क्रिकेट बोर्डाला स्पष्ट केले आहे की सध्याच्या व्यस्त वेळापत्रकात अतिरिक्त सामने खेळणे अशक्य आहे. मात्र भविष्यात जेव्हा कधी भारतीय संघाच्या वेळापत्रकात सवड मिळेल, तेव्हा अशा प्रकारच्या मदतीसाठीच्या सामन्यांसाठी भारत नक्कीच तयार असेल, असेही बीसीसीआयकडून सांगण्यात आले आहे. श्रीलंका दौऱ्यानंतर भारतीय संघाचे वेळापत्रक अत्यंत गजबजलेले आहे. श्रीलंका दौऱ्यानंतर भारत बांगलादेशविरुद्ध ३ वन-डे आणि ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळेल. यानंतर भारतीय संघ मायदेशात अफगाणिस्तानविरुद्ध खेळणार आहे. यानंतर भारतीय संघ न्यूझीलंडच्या ऐतिहासिक दौऱ्यावर जाईल, जिथे ३ कसोटी, ५ वन-डे आणि ५ टी-२० सामने खेळवले जातील.

वर्षाच्या शेवटी ऑस्ट्रेलिया भारत दौऱ्यावर येणार असून दोन्ही देशांमध्ये बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी हाय-प्रोफाइल कसोटी मालिका रंगेल. या सर्व महत्त्वाच्या मालिकांच्या पार्श्वभूमीवर खेळाडूंना दुखापतीपासून वाचवण्यासाठी व विश्रांती देण्यासाठी श्रीलंकेविरुद्धची टी-२० मालिका रद्द करण्यात आली आहे.

# न्यूझीलंड क्रिकेटमध्ये सुवर्णयुगाचा अंत!

## तीन दिग्गज खेळाडूंची एकाच वेळी निवृत्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला टी-२० विश्वचषकाच्या गट टप्प्यातील अखेरच्या सामन्यानंतर न्यूझीलंड संघाच्या तीन खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. या तिघींना सामन्यानंतर खास गार्ड ऑफ ऑनर देत संपूर्ण भरलेल्या स्टेडियमसमोर अलविदा करण्यात आले. आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात इंग्लंडकडून नऊ गडी राखून झालेल्या दारुण पराभवासह न्यूझीलंडच्या विश्वचषकातील प्रवासाचा शेवट झाला. यासह न्यूझीलंडमधील एका सुवर्णकाळाचा शेवट झाला.

लंडनच्या 'द ओव्हल' मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यातील पराभव केवळ किवी संघासाठी निराशाजनकच ठरला नाही, तर न्यूझीलंड क्रिकेटमधील एका ऐतिहासिक आणि सुवर्णयुगाचाही अखेर झाला. या सामन्यानंतर संघातील सोफी डिव्हाईन, सुझी बेट्स आणि ली ताहूहू या तीन दिग्गज खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्यांना अपेक्षित असलेला निरोप मिळाला नसला तरीही या तिघींची कारकीर्द अद्वितीय आणि ऐतिहासिक ठरली.



सोफी डिव्हाइन, सुझी बेट्स आणि ली तहूहू यांनी या स्पर्धेच्या सुरुवातीपूर्वीच निवृत्तीची घोषणा केली होती. न्यूझीलंडच्या महिला क्रिकेटला अत्युच्च शिखरावर नेणाऱ्या या तिन्ही खेळाडूंची आकडेवारीच त्यांच्या महानतेची साक्ष देते. सुझी बेट्स न्यूझीलंड क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात महान आणि सर्वाधिक सामने खेळलेली खेळाडू म्हणून निवृत्त होत आहे. आपल्या ३७० सामन्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत तिने विक्रमी १०,७२१ धावा केल्या आणि सर्वाधिक धावांच्या बाबतीत ती पहिल्या स्थानी आहे.

आपल्या २० वर्षांच्या ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत, अष्टपैलू सोफी डिव्हाइनने न्यूझीलंडसाठी एकूण ३१७ सामने खेळले. यादरम्यान तिने एकदिवसीय सामन्यांमध्ये ४,२७९ आणि टी-२० सामन्यांमध्ये ३,८१७ धावा केल्या, ज्यामध्ये अनेकदा सामना जिंकून देणाऱ्या खेळींचा समावेश होता, तसेच २४१ बळी घेत सर्वात यशस्वी अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत आपलं स्थान निर्माण केलं. त्याचबरोबर किवी संघाची प्रमुख वेगवान गोलंदाज असलेल्या ली ताहूहूने आपल्या १५ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत संघाचे २०७ सामन्यांत प्रतिनिधित्व केले आणि २२५ बळी घेतले.

# टेस्ट क्रिकेटमधील मोठी पार्टनरशिप

## वेस्ट इंडिजच्या फलंदाजांची ४०१ धावांची भागीदारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कसोटी क्रिकेटमध्ये सहाव्या विकेटसाठी सर्वात मोठी पार्टनरशिप प्रदीर्घ काळानंतर ४०० हून अधिक धावांची भागीदारी पाहायला मिळाली आहे. वेस्ट इंडिजचे फलंदाज आमिर जंगू आणि रोस्टन चेस यांच्यात श्रीलंकेविरुद्ध सुरू असलेल्या पहिल्या टेस्ट मॅचदरम्यान ही ऐतिहासिक पार्टनरशिप झाली. आमिर जंगूने दुहेरी शतक ठोकून २३३ धावा केल्या, तर त्याचा साथीदार रोस्टन चेसने १९४ धावांची खेळी खेळली. कर्णधार चेसचे दुहेरी शतक अवघ्या ६ धावांनी हुकले.



टेस्ट क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठ्या भागीदारीचा वर्ल्ड रेकॉर्ड श्रीलंकेच्या दोन दिग्गज फलंदाजांच्या नावावर आहे. कुमार संगकारा आणि महेला जयवर्धने यांनी २००६ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ६२४ धावांची भागीदारी करून वर्ल्ड रेकॉर्ड रचला होता. गेल्या २० वर्षांत आजतागायत कोणत्याही जोडीला हा विक्रम मोडता आलेला नाही. संगकारा आणि जयवर्धने यांच्यातील ही भागीदारी तिसऱ्या विकेटसाठी झाली होती. या मॅचमध्ये जयवर्धनेने डावाची सुरुवात करत त्रिशतक झळकावले होते आणि ३७४ धावांची मॅरेथॉन खेळी खेळली होती. तर दुसऱ्या बाजूला असलेल्या कुमार संगकारानेही २८७ धावा करत दुहेरी शतक ठोकले होते, त्याचे त्रिशतक अवघ्या १३ धावांनी हुकले होते.

आमिर जंगू आणि रोस्टन चेस यांनीही कसोटी क्रिकेटमध्ये रचला इतिहास आहे. आमिर जंगू आणि रोस्टन चेस या जोडीने ४०१ धावांची भागीदारी करून ६व्या किंवा त्याखालील विकेटसाठी सर्वात मोठ्या भागीदारीचा नवा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. तसेच टेस्ट क्रिकेटच्या इतिहासातील ही एकूण सहावी सर्वात मोठी भागीदारी ठरली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com